रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २४८ ॥ पृष्ठे ८ www.krushival.in




# कृषीवल

रायगड ॥ सोमवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२२
किंमत ४ ₹

श्रीसमर्थ आयुर्वेद व पंचकर्म क्लिनिक
वैद्य सौ. निती कुणाल भामरे
सुवर्णप्राशन
वेळ : १४ फेब्रुवारी, दुपारी १२ ते ६ पर्यंत आहे.
संपर्क : ९२०९३०२१९९
आमचा नवीन पत्ता : श्रीसमर्थ आयुर्वेद व पंचकर्म क्लिनीक प्रभाशंकर सोसायटी, बिल्डींग नं ४, श्रीकृपा मेडिकलच्या मागे. पी.एन.पी. नगर, बस स्टँड समोर.




## महत्त्वाचे

### राजू शेट्टी यांचा सरकारला इशारा

**कोल्हापूर :** भूमी अधिग्रहण कायदा ऊस दराचा मुद्दा, वीज वसुली आदी विषयांवरुन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी महाविकास आघाडी सरकारविरोधात भूमिका घेतली आहे. आता शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागणार नसतील तर गप्प बसून चालणार नाही, असा इशाराच शेट्टी यांनी सरकारला दिला आहे. महाविकास आघाडी तयार होत असताना अनेकांचे उंबरे झिजवणाऱ्यांपैकी मी होतो. शेतकरी विरोधी धोरण राबवणाऱ्या भाजपला सत्तेपासून दूर ठेवावा हा हेतू होता. मात्र, शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागणार असतील तर गप्प बसून चालणार नाही. गेल्या दोन वर्षांत ज्या काही गोष्टी चुकीच्या वाटल्या त्या लक्षात आणून देणं महत्वाचं वाटलं. कर्जमाफीचं काय झालं? भूमी अधिग्रहण कायदा का आणला? अशी प्रश्नांची सरबत्तीच शेट्टी यांनी केली आहे.

# रायगडचे किनारे पुन्हा बहरले



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

कोरोनाची रुग्णसंख्या घटताच प्रशासनाने पर्यटनस्थळे पुन्हा खुली केल्याने पर्यटकांची पाऊले पुन्हा रायगडकडे पडू लागली आहेत. गेल्या दोन दिवसांपासून रायगडचे सर्वच किनाऱ्यांना पर्यटकांची भरती आल्याचे चित्र दिसत आहे. गेल्या काही •➤ पान २ वर

# राहूल बजाज पंचत्वात



**। पुणे । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ उद्योजक राहुल बजाज यांच्यावर रविवारी शासकीय इतमामात पुण्यातल्या वैंकुठ स्मशानभूमीतील विद्युतदाहिनीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शरद पवार हे देखील उपस्थित होते. आदित्य ठाकरे छगन भुजबळ, रघुनाथ माशेलकर, दिलीप वळसे पाटील आदींनी राहुल बजाज यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले.




# पंजाब, गोवा, उत्तराखंडमध्ये आज मतदान

## उप्रमध्ये दुसरा टप्पा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पंजाब, गोवा, उत्तराखंड विधानसभा निवडणुकीसाठी सोमवारी (१४ फेब्रुवारी) एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. तर उत्तरप्रदेशमध्ये दुसऱ्या टप्प्यासाठी निवडणूक होणार आहे. चार राज्यात मिळून २८२ जागांसाठी हे मतदान घेतले जाणार आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार गोव्यात ४० जागांसाठी एकाच टप्प्यात सोमवारी मतदान होत असल्याने येथे निवडणुकीची सर्व तयारी पूर्ण झालेली आहे. ३०१ उमदेवार रिंगणात आहेत. पंजाबमध्ये ११७, उत्तराखंडमध्ये ७० तर उत्तरप्रदेशातील ५५ जागांवर हे मतदान घेतले जाणार आहे.

प्रचाराचा कालावधी वाढला. कोरोनाचा संसर्ग आता काहीसा कमी झाल्यानं निवडणूक आयोगानं पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी वेळ वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार आता सकाळी सहा ते रात्री दहा वाजेपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येणार आहे. विशेष म्हणजे नव्या नियमावलीनुसार आता पदयात्रांनाही परवानगी देण्यात आली आहे. पण यासाठी काही अटी-शर्तींचं पालन करावं लागणार आहे.

## मप्रमध्ये बोगद्याचे काम कोसळले

**। भोपाळ । वृत्तसंस्था ।**

मध्य प्रदेशामधील कटनी जिल्ह्यातील स्लेमनाबादमध्ये शनिवारी नर्मदा किनारा कालवा योजनेचे काम सुरू असताना मोठा अपघात झाला. भूमिगत असणाऱ्या उजव्या कालव्याचं काम सुरू असताना झालेल्या या अपघातात नऊ कामगार आत अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# पालीत भरवस्तीत तीन घरफोड्या

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**




पाली पोलीस स्थानकापासून अवघ्या काही अंतरावर असलेले भरवस्तीतील घर, गोडाऊन फोडून चोरट्यांनी रोकड व साहित्य चोरून नेले आहे. तसेच एक बियरशॉपी मधील दारू रोख रक्कम चोरली आहे. एका दुचाकीचीही चोरी केली आहे.

संगीता शशिकांत पाशीलकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पालीतील कासारआळीत राहणाऱ्या संगीता पाशिलकर यांच्या घरी कोणी नसताना अज्ञात आरोपींनी त्यांच्या घराच्या खिडकीचे ग्रील तोडून घरात प्रवेश केला. आणि सर्व सामान अस्ताव्यस्त करून घरातील चाळीस हजार रोख रक्कम चोरून नेली आहे. याशिवाय उन्हेरे येथील गौरी बियर शॉपीच्या दरवाजाचा कडी कोयंडा तोडून येथील १४ हजार ४६० रुपये किमतीचे चार बिअर बॉक्स व सहा हजार रुपये रोख रक्कम चोरट्यांनी पळवून नेली. तसेच तहसील कार्यालयाजवळील सम्राट सुपर मार्केटच्या •➤ पान २ वर




### गुजरातमध्ये २८ बँकांना
# २२ हजार कोटींचा चुना



**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

गुजरातमध्ये एकूण २८ बँकांना तब्बल २२,८४२ कोटींचाचुनालावणाऱ्याएबीजी शिपयार्ड या कंपनीविरोधात सीबीआयनं गुन्हा दाखल केला आहे. शनिवारी दिवसभर या कंपन्यांच्या कार्यालयांवर सीबीआयकडून छापेमारी सुरू होती! हा आत्तापर्यंत उघड झालेल्या सर्वात मोठ्या घोटाळ्यापैकी एक मानला जात आहे.

सीबीआयने एबीजी शिपयार्ड विरोधात आणि कंपनीच्या संचालकांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. एकूण २८ बँकांची तब्बल २२ हजार ८४१ कोटींना फसवणूक केल्याचा आरोप या कंपनीवर लावण्यात आला आहे. या प्रकरणात सीबीआयनं शनिवारी दिवसभर कंपनीच्या कार्यालयांवर धाडसत्र राबवले. एबीजी शिपयार्ड कंपनीसोबतच कंपनीचे संचालक रिशी अग्रवाल, संथानम मुथुस्वामी आणि अश्विनी कुमार यांच्यावर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या घोटाळ्यावरुन काँग्रेस नेते राहूल गांधी यांनी मोदींच्या काळात आतापर्यंत ५ लाख ३५ हजार कोटी रुपयांची बँक फसवणूक झाली असल्याचा आरोप केला आहे.



## अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१४ फेब्रुवारी**

१) श्री. शरद माहिमकर
१४-०२-१९४०
नागाव, हटाळे

२) श्री. अमर म्हात्रे
नवगाव, अलिबाग
१४-०२-१९५२

## म ह त्वा चे

### वीर वाजेकर शेठ यांची पुण्यतिथी

। उरण । वार्ताहर ।

जि.प.चे माजी अध्यक्ष, शेकाप नेते स्व.तुकाराम हरी वाजेकर यांची ४१ वी पुण्यतिथी मंगळवारी (१५ फेब्रुवारी) रोजी सकाळी १० वाजता उरण पेठा



मिठागर कामगार संघ कार्यालय कोटनाका उरण शहर येथे शेतकरी कामगार पक्षाचे नेते तथा विद्यमान आमदार बाळाराम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात येणार आहे. तसेच राजपाल नाका ते राघोबा मंदिर या मार्गाचे 'तुकाराम हरी वाजेकर' या नामफलकाचे अनावरण विद्यमान आमदार महेश बालदी यांच्या हस्ते होणार आहे. उरणमधील सर्व ज्येष्ठ सभासद, नागरिकांनी या कार्यक्रमाला वेळेत उपस्थित राहावे असे आवाहन उरण पेठा मिठागर कामगार संघटनेचे बा. ध. पाटील, उरण पेठा मीठ उत्पादक संघटनेचे महादेव बंडा यांनी केले आहे.

### नवीन रूग्णवाहिकेचे लोकार्पण

। पनवेल । वार्ताहर ।

श्री बालाजी कार्डिक ॲम्ब्युलन्सचे मालक राज निंबर्गी यांच्या नवीन रुग्णवाहिकेचे उद्‌घाटन केदार सुरेश भगत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोमनाथ पवार, नितीन कसबे, महेंद्र पाटील, हर्षद



गडगे, योगेश साळवी, गौरव सावंत, नितेश भगत, संकेत दसवते, सुमित दसवते, भावेश शिंदे, यज्ञेश पाटील, अथर्व पाटील, साहिल मोरे, इम्रान खान, संतोष निम्बार्गी, विजय जाधव, योगेश कुलकर्णी उपस्थित होते.

# करंजाडे वसाहतीवर आता सीसीटीव्हीची नजर

**➤सिडको प्रशासनाची कार्यवाही ➤नागरिकांमध्ये समाधान**




। पनवेल । वार्ताहर ।

सिडकोने नव्याने विकसित केलेल्या करंजाडे वसाहतीमध्ये सीसीटीव्ही बसवण्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली आहे. याबाबत सिडको प्रशासनाकडे गेली अनेक वर्षे वारंवार पाठपुरावा केल्यानंतर करंजाडेत सीसीटीव्ही बसवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. यासाठी पनवेल शहर पोलीस प्रशासनाचेही मोलाचे सहकार्य लाभले. सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे नागरिक आभार मानत आहेत.

सद्यस्थितीत करंजाडे वसाहतीची लोकसंख्या साधारण ७० हजारांहून अधिक आहे. याठिकाणी स्थानिक नागरिकांसह मुंबई, ठाणे, कल्याण आदी शहरांसह कोकण व घाटमाथ्यावरून नोकरीधंद्यासाठी आलेल्या नागरिकांची संख्या अधिक आहे. त्यामुळे नागरिकांच्या, लहान मुलांच्या व विशेषतः महिला सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून करंजाडे वसाहतीत सीसीटीव्ही बसवण्याची आवश्यकता होती. त्या दृष्टिकोनातून करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच रामेश्वर आंग्रे, पोलीस प्रशासन, करंजाडे फ्लॅट ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत गुजर, प्रबुद्ध सामाजिक संस्था यासह अनेकांचा याबाबत सिडको प्रशासनाकडे पाठपुरावा सुरूच होता. अखेर सिडकोने वसाहतीत सीसीटीव्ही बसवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असून करंजाडे वसाहतीतील महत्त्वाच्या ठिकाणी एकूण ११ सीसीटीव्ही बसवण्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे.

> करंजाडे हद्दीत सीसीटीव्ही बसवण्याच्या कामाला सुरुवात झाल्याने गुन्हेगारी रोखण्याच्या दृष्टीने तसेच गुन्ह्यांची उकल करण्यासाठी पोलीस प्रशासनाला सीसीटीव्ही अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.
> – विजय कादबाने (वरिष्ठ पोलीस निरीक्षक,

> करंजाडे वसाहतीत सीसीटीव्ही बसवण्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली असून सिडको प्रशासन व वपोनि विजय कादबाने यांचे समस्त करंजाडे नागरिकांच्या वतीने आभार मानतो.
> – रामेश्वर आंग्रे (सरपंच– करंजाडे ग्रामपंचायत)

## हरिग्राम उपसरपंचपदी राजश्री घरत बिनविरोध



। पनवेल । वार्ताहर ।

हरिग्राम ग्रामपंचायत उपसरपंच पदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या राजश्री दिपक घरत यांची बिनविरोध निवड करण्यात आली. गेली पंचवीस वर्षे ग्रामपंचायतीवर शेकापची एकहाती सत्ता आहे. आता महाविकास आघाडीच्या माध्यमातून शिवसेनेचे हरिग्राम शाखा प्रमुख दिपक घरत यांच्या पत्नी राजश्री घरत यांची निवड करण्यात आली.

यावेळी हरिग्राम ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सदस्य महाविकास आघाडीचे सारे पदाधिकारी मंडळी तसेच पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, शिवसेना महानगर प्रमुख रामदास शेवाळे, शिवसेना नेते रामदास पाटील, वृषाली देशेकर, जिल्हा परिषद सदस्य विलास फडके, क्रांतिकारी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष नामदेव फडके, दर्शन ठाकूर, एकनाथ म्हात्रे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक संतोष पाटील उपस्थित होते.

## दस्तुरी फाट्यावर पालखी, वारकऱ्यांना सुविधा पुरवा–शेडगे



। खोपोली । वार्ताहर ।

दस्तुरी येथील पालखी व दिंडी निवासस्थान विसावा ठिकाणी वारकऱ्यांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष निधीची गरज असल्याची मागणी धनगर समाजाचे नेते बबन शेडगे यांनी केली आहे.

गोवरदेव (कांजूरमार) येथील आई एकविरेच्या पालखी सोहळ्याच्या स्वागताप्रसंगी ते बोलत होते.यावेळी लक्ष्मण बावदाने, भाऊ शेडगे, बाळासाहेब हिरवे (मल्हारवाडा), बबन खरात, भरत कोकरे, सतीश शेडगे, हनुमंत बुरूमकर, नारायण हिरवे, दत्ता शेडगे आदी उपस्थित होते.

खोपोलीपासून सुरू होणाऱ्या बोरघाटातील दस्तुरी येथे शिंग्रोबा कमिटीच्या वतीने येणाऱ्या बहुतांश पालखी व दिंड्याचे यथोचित सत्कार करून त्यांच्या विश्रांतीसाठी विशेष सहकार्य व नाष्टाची सोय शिंग्रोबा कमिटीच्या माध्यमातून करण्यात येत असते. मात्र याठिकाणी काही सुविधांचा अभाव असल्याने शिंग्रोबा कमिटीला मदतीचा हात देताना मोठी कसरत करावी लागत असून ही सर्व कसरत दूर व्हावी आणि वारकरी मंडळींना योग्य सुविधा मिळावी यासाठी विशेष निधीची गरज असून या निधीच्या माध्यमातून याठिकाणी काही सुविधा उपलब्ध करता येतील, असे मत व्यक्त केले आहे.

## बोअरवेलची तातडीने दुरूस्ती करा

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील फणसवाडी येथील मराठी शाळेतील बोअरवेलची तातडीने दुरूस्ती करण्याची मागणी शिवसेना नेते गुरूनाथ पाटील यांनी पनवेल महानगरपालिका खारघर प्रभाग अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. फणसवाडी या शाळेतील बोअरवेल गेल्या काही दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे शाळेत शिकणाऱ्या या परिसरातील आदीवासी विद्यार्थी बांधवांची मोठी गैरसोय होत आहे. तरी या संदर्भात पनवेल महानगरपालिकेने लक्ष घालून तातडीने बोअरवेल दुरूस्ती करून घेऊन येथील पाण्याचा प्रश्न सोडवा अशी मागणी त्यांनी केली आहे.

## इस्त्रायल नागरिकाची जमीन बळकावली

। पनवेल । वार्ताहर ।

इस्त्राईल देशातील नागरिकाच्या जागी बनावट व्यक्ती उभा करुन तसेच बनावट कागदपत्रे तयार करुन त्याच्या नावे पनवेलच्या गुळसुंदे भागात असलेली कोट्यवधी रुपये किंमतीची जमीन चौघा व्यक्तींनी बळकावल्याचे उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे या आरोपींनी सदरची जमीन बळकावल्यानंतर ती परस्पर दुसऱ्या व्यक्तीला विकुन टाकल्याचे देखील उघडकीस आले आहे. पनवेल शहर पोलिसांनी या प्रकरणातील चौघा आरोपीं विरोधात फसवणुकीसह बनावटगिरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे.

तक्रारदार रुवेन बेंजामिन भालकर (७५) हे मुळचे इस्त्राईल नागरिक असून त्यांचे आई-वडील पुर्वी पनवेल मधील गुळसुंदे येथील आकुळवाडी गावात कुटुंबासह राहण्यास होते. त्यावेळी आकुळवाडी येथे बेंजामीन भालकर यांच्या नावे शेतजमीन होती. १९७३ मध्ये इस्त्राईल सरकारने सर्व जगातील इस्त्राईल नागरिकांना आपल्या देशात परत बोलावल्याने बेंजामिन भालकर हे त्यावेळी आपल्या संपुर्ण कुटुंबाला घेऊन इस्त्राईलमध्ये गेले होते. त्यानंतर बेंजामीन भालकर हे भारतात पनवेल येथे अधुन-मधुन येत जात होते. मात्र ऑक्टोबर २००० मध्ये बेंजामीन भालकर यांचा इज्राईल देशात मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या नावे पनवेलमध्ये जमीन असल्याने बेंजामीन भालकर यांचे वारसदार असलेल्या त्यांच्या मुलांचा गुळसुंदे येथे नियमित संपर्क होता. मात्र २००५ मध्ये अंतर्गत युद्ध सुरु झाल्यानंतर भालकर कुटुंबिय २००७ ते १६ या कालावधीत भूमिगत झाले होते. मात्र नंतर रुवेन भालकर हे २०१८ मध्ये भारतात आल्यानंतर त्यांची वडीलोपार्जीत जमीन दुसऱ्यांनी बळकावल्याचे व त्याची परस्पर दुसऱ्याला विक्री केल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानंतर रुवेन भालकर यांनी सदर जमीन खरेदी विक्री संदर्भातील कागदपत्रे मिळविली असता, वसंत रामदास कोळी याने बेंजामिन भालेकर यांच्या जागी बनावट व्यक्तीला उभे करुन तसेच बनावट कागदपत्रे तयार करुन सदरची जमीन स्वत:च्या नावावर करुन घेतल्याचे व त्यानंतर वसंत कोळी याने सदरची जमीन मोहम्मद यासीन मोहम्मद आरीफ पटेल याला विकल्याचे आढळून आले.

## ओटी भरण कार्यक्रमात शून्य कचऱ्याचा संकल्प




। नेरळ । प्रतिनिधी ।

बेलवली गावात राहणारे स्व.शरद शिवाजी वारे यांचे सुनबाई श्रद्धा किरण वारे यांची ओटी भरण कार्यक्रम वारे कुटुंबाने आयोजित केला होता. या कुटुंबाने स्वच्छतेविषयी जागरूकता दाखवित ओटी भरणाच्या समारंभात पर्यावरण पूरक वस्तूंचा वापर करीत कोव्हिड-१९ चे नियम पाळत शून्य कचरा उपक्रम राबविला. दरम्यान, ओला, सुका कचरा वेगळा करण्यापासून कार्यक्रमातील सर्व साहित्य कागदी वापरून वसुंधरा वाचविण्याचा संदेश दिला असून वारे कुटुंबाच्या या माझी वसुंधरा उपक्रमाचे पालिका प्रशासनाने कौतुक केले आहे. कोरोना नियमांचे पालन करून अगदी जवळच्या नातेवाईक यांना कार्यक्रमात निमंत्रित करण्यात आले.

## रामवाडी घावरेकोंड येथे सत्कार सोहळा



। महाड । प्रतिनिधी ।

रामवाडी घावरेकोंड येथे अखंड हरिनाम सप्ताहचे औचित्य साधून श्रीराम विकास मंडळ मुंबई-पुणे-बडोदे-फौजि-जंगमवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोना काळात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या गावकरी व सैन्य तसेच पोलीस दलातील निवृत्त अधिकारी यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी आ. भरत गोगावले, जि.प.सदस्या निकिता ताठरे, सीताराम कदम, गोसावी, उदय लेंगारे, डॉ. माने, सुभेदार नामदेव कदम, तसेच सत्कारमूर्ती सरपंच सुनिता सुतार, उपसरपंच सतीश जाधव, कॅप्टन महिपत शिंदे, ज्ञानदेव सकपाळ, जयराम सुतार, अंगणवाडी सेविका ज्योत्स्ना शिंदे, सन्मान सोहळा मानकरी विष्णु दळवी, हवालदार संजय जंगम, सुरेश जंगम, सहदेव कदम, नामदेव भोसले, अशोक सकपाळ, सिताराम शिंदे, राकेश कदम, समीर उतेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयुक्त कृती समिती अध्यक्ष तुकाराम महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष दिनकर जाधव, सरचिटणीस शिवाजी कदम, मनोहर भोसले, अशोक शिंदे, विष्णु महाराज सपकाळ, दत्ताराम शिंदे, नारायण जाधव, रामभाऊ सुतार, संतोष जाधव, शशिकांत दळवी, वासुदेव कदम यांनी विशेष मेहनत घेतली.

## महाराष्ट्राची वाटचाल निर्बंधमुक्तीकडे मुख्यमंत्री सकारात्मक – टोपे

। जालना । प्रतिनिधी ।

सध्या राज्यभरात कोरोना रुग्णसंख्येत रोज घट होत असून मार्चच्या मध्यावधीपर्यंत तिसरी लाट बऱ्यापैकी ओसरेल, अशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी जालन्यात दिली. सध्या राज्यात मास्क मुक्ती केली जाणार नाही. त्यामुळे तूर्तास राज्यात मास्कमुक्ती बाबत कोणताही निर्णय घेतला जाणार नसून जशी परिस्थिती येईल, त्यानुसार निर्णय घेतला जाईल अशी माहिती देखील टोपे यांनी दिली. राज्यात रुग्णसंख्या कमी होत असली तरी नागरिकांनी पहिल्या आणि दुसऱ्या डोसचं लसीकरण करून घ्यावे असं आवाहन केले आहे.

राज्यात नव्याने आढळणाऱ्या रुग्णांच्या संख्येत जानेवारीच्या तुलनेत फेब्रुवारीमध्ये मोठ्या प्रमाणावर घट झाली. जानेवारीमध्ये दैनंदिन सुमारे ३३ हजार ५१० रुग्ण आढळत होते, तर फेब्रुवारीमध्ये हे प्रमाण ११ हजार ८९२ रुग्ण आढळले आहेत.

> निर्बंध कमी करण्याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली असून सध्या राज्यात लागू असलेले निर्बंध कमी करण्याबाबत मुख्यमंत्री सकारात्मक आहेत. कोरोना रुग्णसंख्येत बरीच घट झाली आहे, तसेच दिवसेंदिवस रुग्णसंख्या कमी होत आहे, त्यामुळे येत्या काळात निर्बंध हटवले जाण्याची शक्यता आहे.
> – राजेश टोपे,आरोग्य मंत्री

पान १ वरून

### रायगडचे किनारे पुन्हा बहरले

दिवसांपासून कोरोनाची रुग्णसंख्या वाढताच निर्बंध घातले जात आहेत तर प्रादुर्भाव कमी होताच हे निर्बंध शिथिल केले जात आहेत.त्यानुसार यावेळीही प्रशासनाने पर्यटन स्थळे खुली केल्याने पर्यटकांचा आनंद द्विगुणीत झाला असून,विकेंडसाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक रायगडात दाखल झालेले आहेत.याचा फायदा पर्यटनावर अवलंबून असलेल्या सर्वच घटकांना होत असून,जिल्ह्यातील सर्व समुद्रकिनारे,तेथील हॉटेल्स,लॉजेस,वाड्या,फार्महाऊसेस हाऊसफुल्ल झालेली आहेत.पर्यटकांच्या आगमनाने किनारेही आता फुलून गेलेले आहेत.

दरम्यान,पर्यटकांची संख्या वाढल्याने वाहतूक व्यवस्थेवर विपरित परिणाम झालेला आहे.ठिकठिकाणी पर्यटकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला आहे.

### पालीत भरवस्तीत तीन ठिकाणी घरफोड्या

गोडाऊनचे लोखंडी शटर उचकटून आत प्रवेश केला व तेथील ड्रॉव्हर मधील पाच हजार रुपये रोख रक्कम चोरून नेली आहे. याबरोबरच बल्लाळेश्वर नगर येथील साजेकर चाळीमध्ये राहणारे मोलमजुरी करणारे संतोष यादव यांची घराबाहेर लावलेली वीस हजार रुपये किमतीची मोटरसायकल चोरट्यांनी पळवून नेली आहे. तपास पोलीस निरीक्षक विश्वजित काइंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार आर. एम. पवार व पोलीस हवालदार व्ही. जे. पाटील करत आहेत.

## वॉर्टसिला तर्फे लसीकरण मोहीम

**३ हजार ९०० हून अधिक नागरिकांना मोफत डोस**




। खोपोली । प्रतिनिधी ।

वॉर्टसिला इंडियाच्या कंपनीने सीएसआर उपक्रमांतर्गत मोफत कोविड प्रतिबंध लसमीकरण कार्यक्रमाचा एक भाग म्हणून खोपोली शहर आणि त्याच्या कार्यक्षेत्रातील जवळपाशी बहुसंख्य गावांमधील ३ हजार ९०० हुन अधिक रहिवाशांचे लसीकरण करीत सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य केले आहे.

कंपनीने मोफत कोविड प्रतिबंध लसमीकरण दि.२८ ऑक्टोबर २०२१ रोजी सुरु केले.कंपनीच्या आवारात लसीकरण मोहिम सुरू करीत पुढे दुर्गम भागांमध्ये राहणाऱ्या लोकांना खालापूर तालुक्यातील चावणी, तुकसई, सारसन, खानाव, आत्करगाव, खिरकंडी अशा विविध गावांमधील अबालवृध्दांसह नागरिकांचे लसीकरण केले आहे.

सर्व लोकांना सुरक्षितपणे व सुलभपणे लस उपलब्ध करून देण्याच्या खात्रीसाठी आम्ही वॉर्टसिला इंडिया येथे तसेच आसपासची ठिकाणे व गावांमध्ये ऑनसाइट लसीकरण शिबिराचे आयोजन केले असून दुर्गम भागांमध्ये राहणा-या लोकांना कुटुंबाना आणि विशेषतः अबालवृद्धांना आरामदायी सोविसुविधा देण्याचा मनसुबा होता. असे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आर. वेंकटेश यांनी बोलताना सांगीतले.

## वैभव धनावडे लिखित अक्षरबंध हायकू संग्रहास पुरस्कार



। मुंबई । प्रतिनिधी ।

९४ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन (नाशिक) येथे प्रकाशित झालेल्या वैभव धनावडे लिखित अक्षरबंध हायकू संग्रहास अक्षरमंच सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान ह्यांच्या तर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा अक्षरगंध पुरस्कार जाहीर झाला आहे.

वैभव धनावडे हे अभियंता म्हणून कार्यरत आहेत. मराठी भाषेसाठी झटणाऱ्या विविध भागातील विविध आणि स्तरांतील लोकांना एकत्र घेऊन त्यांनी साहित्यसंपदाची स्थापना केली आहे. राज्यस्तरीय साहित्य संमेलनं, विविध कार्यशाळा, साहित्य क्षेत्राशी निगडित असणारे विविध उपक्रमांमध्ये सहभाग आणि यशस्वी आयोजन ह्यात त्यांचा हातखंड आहे. नुकताच त्यांना साहित्य गौरव, पुणे ह्यांच्या तर्फे त्यांना पुरस्कार सुद्धा प्रदान करण्यात आला असून साहित्यसंपदाच्या माध्यमातून १२१ तासांचा अखंड काव्यवाचन विश्व विक्रम आणि इ पुस्तक प्रकाशनाचा राज्यस्तरीय विक्रम त्यांच्या नावे आहे.

## गोवे उपसरपंचपदी भावना कापसे



। गोवे । वार्ताहर ।

गोवे.ता.रोहा उपसरपंचपदी भावना कापसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी सरपंच महेंद्र पोटफोडे, नितीन जाधव, नरेंद्र जाधव, रामशेठ कापसे, राकेश शिंदे, रंजिता जाधव, निशा जवके, अंजली पिंपळकर आदी उपस्थित होते.

## मोफत आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद

। पनवेल । प्रतिनिधी ।

पीर करमअली शहा दर्ग्याच्या उर्सानिमित्त शिवसेना पनवेल उपशहर संघटक अबरार मास्टर कच्छी यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. शुश्रुशा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या माध्यमातून विविध तपासण्या करण्यात आल्या. या आरोग्य शिबिरात ५००हुन अधिक लोकांनी लाभ घेतला. या आरोग्य शिबिराचे उदघाटन शिवसेनेचे सल्लागार बबन पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. तसेच या आरोग्य शिबिरास खासदार श्रीरंग बारणे यांनी भेट दिली.

शिबिरास डॉ. राजेंद्र क्षीरसागर, डॉ. रेश्मा शेख, नर्स साक्षी पाटील, लॅब टेक्निशियन ईश्वरी कल्याणकर आदींनी विशेष मेहनत घेतली. सदर शिबिरास माजी नगरसवेक लतीफ शेख, शिवसेनेचे प्रथमेश सोमण, माजी उपशहर संघटक बाबुभाई, पनवेल शहराध्यक्ष प्रवीण जाधव, जमील खान, जुनैद पवार, सुफियान मुकादम, नुरुल्ला वाईकर यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

। पनवेल । वार्ताहर ।

एका बंद घरात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत लाखोंचा ऐवज चोरून नेल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. बंदररोड येथील कोनार्क प्लाजा सोसायटीतील दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या अल्ताफ नमरे यांच्या राहत्या घराच्या दरवाज्याचे लॅच लॉक कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी कशाच्या तरी




सहाय्याने तोडून घरात प्रवेश करून घरातील सोन्या चांदीचे दागिने व रोखरक्कम असा मिळून ३,५८,३२० रू. चा मुद्देमाल घरफोडीत चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022)

# अबोल प्रीत बहरली

## उमेश-निवेदिताच्या 'मुक्या संवादा'ची बोलकी कहाणी

**राकेश लोहार, चौल**

मनातील प्रेमरुपी भावनांना व्यक्त करण्याचे मुख्य माध्यम म्हणजे संवाद. मुळात, प्रेमाचा उगमच संवादातून होतो, हेही तितकेचे खरं. परंतु, संवादाशिवाय स्पर्श अन् हावभावही प्रेम व्यक्त करण्याचे माध्यम बनू शकते, आणि त्यातूनही 'अबोल प्रीत' बहरास येते, याचे सुंदर उदाहरण उमेश आणि निवेदिता हे दाम्पत्य. त्यांची 'लव्हस्टोरी'सुद्धा समाजापुढे एक आदर्श म्हणून पाहता येईल. आज व्हॅलेंटाईन डे'च्या निमित्ताने त्यांचा हा प्रेमरुपी प्रवास...

अलिबाग तालुक्यातील भायमळा येथील अनंत पाटील यांचे पत्नी, दोन मुले आणि मुलगी असे छोटे आणि सुंदर कुटुंब. याच कुटुंबात उमेशचा जन्म झाला. म्हणतात ना बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, त्याचप्रमाणे उमेश लहानपणापासूनच चलाख, दिसायलाही गोरागोमटा होता. त्यामुळे सर्वांचाच लाडका. आईवडिलांनाही मुलाचे कौतुक होते. परंतु, आपल्या मुलाचे 'बोबडे बोल' त्यांच्या नशिबात नव्हते. जन्मताच मूक (अबोल) असल्याने तो 'आई' किंवा 'बाबा' बोलू शकला नाही. परंतु, याबाबत कोणतेही दुःख न बाळगता आईवडिलांनी उमेशला चांगले शिक्षण देऊन घडविण्याचे ठरविले. कारण, शिक्षण हे कोणत्याही संकटावर किंवा व्यंगावर मात करण्याचे प्रमुख अस्त्र आहे. अशी अनेक उदाहरणे आहेत, की ज्यांनी शिक्षणामुळे आयुष्याचा मार्ग सुकर केला आहे. शिक्षणाचे महत्त्व त्यावेळी उमेशच्या आईवडिलांनी जाणले, आणि त्याचे भविष्य घडविण्याचे ठरविले.

सुरुवातीस नागाव आणि त्यानंतर अलिबाग येथील मूकबधीर शाळेत उमेशने चौथीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. आजकाल प्रेमाची सुरुवात शालेय जीवनातच होते. मनानेच काढलेल्या चित्रांत रंग भरायला सुरुवात होते आणि हळूहळू आकर्षण वाढू लागतं. त्याची परिणती प्रेमात होते. या गोष्टीस उमेशही अपवाद नाही. कारण, उमेश ज्या शाळेत शिकत होता, त्याच शाळेत निवेदिता (पूर्वाश्रमीची निवेदिता चंद्रकांत पाटील, रा. पळी) हीदेखील शिकत होती. तेव्हापासून त्यांची ओळख. पुढे ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. संवादाविनाही त्यांची 'अबोल प्रीत' फुलली- बहरली ती फक्त नि फक्त नजरेच्या इशाऱ्यातून आणि हावभावातून.

लग्नाच्या रेशीमगाठी या स्वर्गातच बांधलेल्या असतात असे म्हणतात, ते उमेश आणि निवेदिता यांच्याबाबतीतही खरे म्हणावे लागेल. कारण, चौथीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर दोघेही आपापल्या घरी होते. उमेश वडिलांच्या व्यवसायात त्यांना मदत करीत असे, तर निवेदिता आईला घरकामात हातभार लावे. परंतु दोघांचे मन मात्र एकमेकांत गुंतले होते. दोघांनाही एकमेकांसोबत संसार करायचा होता. आयुष्यभर एकत्र राहायचे होते. हेच दोघांच्या मनातील प्रेम जाणले होते ते त्यांच्या वडिलांनी. योगायोगाने उमेशचे वडील अनंत पाटील आणि निवेदिताचे वडील चंद्रकांत पाटील वर्गमित्र. पेझारीच्या नाना पाटील विद्यालयाचे विद्यार्थी. त्यांनीच दोघांच्या लग्नासाठी पुढाकार घेतला आणि लग्न निर्विघ्नपणे पार पडले.

सुरुवातीला घरच्यांनाही दोघांच्यातील इशाऱ्यावर बोलण्याची वेगळीच गम्मत वाटायची आणि त्यामुळे तितक्याच वेळा एकमेकांच्या चेहऱ्यावर हसूदेखील पाहायला मिळायचे. शब्दात बोलण्यापेक्षा हावभावातून सुरु असलेला 'मुका संवाद' त्यांना आनंद देत असे. यातूनच एकमेकांना काय हवंय नको कळायला लागलं आणि दोघांचा जिव्हाळा वाढत गेला. तिच्या स्वप्नातील राजकुमार आणि त्याच्या स्वप्नातील परी ही प्रत्यक्षात अवतरल्यामुळे त्यांना स्वर्गही ठेंगणा वाटू लागला आणि दोघेही गुणगुणू लागले...

**शब्द झाले मुके, बोलती पैंजणे**
**उतरले गाली या, सोवरी चांदणे**
**पाहताना तुला, चंद्रही लाजला**
**ओळखू लागलो...**
**तू मला... मी तुला...**

अशा अबोल संवादातून त्यांचे प्रेम निर्माण झाले अन् बहरतही गेले. एकमेकांना जुळवून घेण्याची तयारी असेल तर कोणतीही भाषा आड येत नाही, हे उमेश आणि निवेदिता यांच्याकडे पाहून लक्षात येते. उमेश अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीमध्ये परिचर म्हणून काम करीत असून, संपूर्ण संसाराचा गाडा हाकण्यास मदत करीत आहे. आज या दोघांना दिव्या आणि दीक्षा अशा सुंदर जुळ्या मुली असून, त्या अलिबाग येथील केईएस नंदा देशमुख ज्युनिअर कॉलेजमध्ये अकरावीत शिक्षण घेत आहेत. त्यांनी पेझारीच्या नाना पाटील हायस्कूलमध्ये दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले असून, एकीने ९४, तर दुसरीने ९३ टक्के गुण मिळविले आहेत.

**तुझ्या माझ्या नात्याला**
**गरज नाही शब्दांची**
**न बोलताही होते**
**देवाण-घेवाण भावनांची**

खरंच आहे हे... शब्दरुपी संवाद या दोघांमध्ये नसला तरी स्पर्श अन् हावभाव यांनी मने जुळली आणि संसार सुखाचा झाला. व्यक्त होताना प्रेमाच्या वाटा वेगळ्या असल्या तरी, प्रेमाची भाषा एकच असते, हेच यावरुन सिद्ध होते. १४ फेब्रुवारी २००५ रोजी दोघेही लग्नबंधनात अडकले. आज उमेश आणि निवेदिता यांच्या लग्नाला १७ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांच्या सुखी संसाराला मनःपूर्वक शुभेच्छा...

(९७६५६१०८४८) ■



# तु हो रे माझा मितवा

आमच्या प्रेमविवाहाला ४४ वर्षे पूर्ण झाली. या चार दशकांच्या वाटचालीत प्रेमात तसूभरही फरक पडला नाही. अनेक संकटांवर मात करीत आनंदाचे क्षण गोड करीत अजूनही आमच्या प्रेमाचा गोडवा कायम टिकला आहे. अशी प्रेमपूर्वक कबुली अलिबागमधील ज्येष्ठ विधिज्ञ निला तुळपुळे यांनी दिली. 'व्हॅलेन्टाईन डे'च्या निमित्ताने त्यांच्या 'लव्हस्टोरी'विषयी त्यांना बोलते केले असता, त्यांनी आपल्या सहजीवनाचा उलगडा केला.

२५ जून १९७५ ला देशात लागलेली आणीबाणी आणि त्याच आणीबाणीतून सुरू झालेली तुळपुळे दाम्पत्याची ही प्रेमकहाणी. हीच आणीबाणी मोडून काढण्यासाठी अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांनी सत्याग्रह केले. त्याचदरम्यान, अलिबाग येथील विद्यार्थ्यांनी केलेल्या सत्याग्रहात निला तुळपुळे व गिरीश तुरपुळे हे दोघेही सहभागी होते. महत्त्वाचे म्हणजे, गिरीश तुळपुळे या सत्याग्रहाचे नेतृत्व करीत होते. त्यामुळे निला तुळपुळे या अंगी नेतृत्वगुण असणाऱ्या गिरीश यांच्या प्रेमात पडल्या. सत्याग्रह केला आणि तिथेच या दोघांची पहिली भेट झाली. आणि त्यानंतर विचार जुळले, परिचय वाढला, प्रेमाचा संवाद सुरू झाला आणि हे प्रेमाचं रोपटं हळूहळू बहरू लागलं. १९७५ साली सुरू झालेल्या या प्रेमकहाणीचे रुपांतर २४ नोव्हेंबर १९७८ ला विवाहबंधनात झाले.

प्रत्येक प्रेमकहाणीत अडथळे, नकार, संकटं ही अटळ आहेत. पण, या सगळ्यावर मात करत, आपल्या प्रेमावर निखळ विश्वास ठेवत जे आयुष्यभर एकमेकांना साथ देण्याच्या निर्णयावर ठाम असतात, त्यांच्या प्रेमाला कोणतेच अडथळे, संकटं पराभूत करु शकत नाहीत. अगदी असेच निला तुळपुळे यांच्या कुटुंबाकडून त्यांच्या या प्रेमाला साफ नकार होता. पण, म्हणतात ना- ये इश्क नही आसान, मुश्कील इसे पाना है। एक आग का दरिया है, और डुबके जाना है।

मग काय? या दाम्पत्याने पळून जाऊन लग्न केले. पण, लग्नाच्या ३-४ वर्षांनंतर दोन्ही कुटुंब एकत्र आले. आणि, ४४ वर्षांनंतरही त्यांच्या प्रेमाचा गोडवा आजही कायम टिकून आहे. प्रेम केल्यावर घरच्यांचा विरोध असताना फक्त पळून जाऊन लग्न करणं, हे काही शौर्याचं काम नसतं, तर ते नातं आयुष्यभर तसंच निभावणं, हे महत्त्वाचं असतं. हल्लीच्या प्रेम करणाऱ्यांमध्ये प्रेमात असताना जग फार सुंदर वाटतं, पण वास्तविकतेत संसार सुरू झाल्यानंतर विचार जुळत नाहीत, परिपक्वता नसते, विश्वासाचे धागे घट्ट नसतात. त्यामुळे बहुधा संसार टिकत नाहीत, असे मत ॲड. निला तुळपुळे यांनी व्यक्त केले.



**सायली पाटील**

# तुला-मला आणखी काय हवे?

प्रेमात जागा, वेळ, काळ हे काहीच ठरलेलं नसतं. मुळात, ठरवून झालं असतं तर ते प्रेम कसलं? अचानकपणे एखादी व्यक्ती आपल्या आयुष्यात येते आणि आयुष्याचा एक अविभाज्य भाग बनून जाते. प्रेमाच्या या वेगवेगळ्या वाटांवर...

प्रेम म्हणजे, प्रेम म्हणजे, प्रेम असतं,
आणि खरं असेल तर तुमचं-आमचं
सगळ्यांचच सेम असतं.

अगदी या ओळींप्रमाणेच अतिशय साध्या पद्धतीने प्रेमात पडलेल्या पाटील दाम्पत्याची ही प्रेमकहाणी.

पुण्यात शिक्षणासाठी गेलेल्या प्रसाद पाटील आणि सुजाता पाटील यांच्या प्रेमाची सुरूवात मैत्रीतून झाली. मैत्रीतून सुरू झालेल्या प्रेमाची बातच काही और असते. सुजाता सहस्त्रबुद्धे या त्यांच्या मैत्रिणींसोबत विद्यार्थी सहाय्यक समिती लेडीज हॉस्टेलमध्ये राहात होत्या. आणि, एकाच कॉलेजात असल्यामुळे प्रसाद पाटील आणि सुजाता पाटील यांची चांगली मैत्री झाली होती. आणि, याच मैत्रीतून सुरू झाला त्या दोघांच्या प्रेमाचा प्रवास.

दोघांनाही सामाजिक विषय, साहित्य, कविता, वाचन यांची आवड असल्याने जन्मपत्रिकेतले ३६ चे ३६ गुण जुळावे अगदी तसेच दोघांचे विचार व आवडीनिवडी जुळून आल्या होत्या. १९८८ ते १९९० पर्यंत सुरू असलेल्या भेटीगाठी, पत्रांमधून व्यक्त होणाऱ्या या प्रेमाचे रुपांतर ८ जून १९९० ला लग्नात झाले.

पण, महत्त्वाचे म्हणजे, प्रेम म्हटलं की नुसत्या गप्पा, मजामौज, फिरणं इतकंच नसतं. तर, प्रेम म्हणजे एकमेकांना समजून घेणे, विचारांची जुळवाजुळव, सामंजस्य, आदर या सगळ्या गोष्टी आल्या. आणि, या सगळ्याची समज असणाऱ्या या दाम्पत्याने आपल्या लग्नात घरच्यांना कोणताच खर्च न देता आपण आपल्याला जमेल तसं लग्न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्यांनी अतिशय साध्या पद्धतीने कर्णिक हॉल, अलिबाग येथे रजिस्टर पद्धतीने लग्न केले. आणि, ३१ वर्षांनंतरही त्यांच्या प्रेमाचा आंबट-गोड असा हा प्रवास अगदी सुखाचा सुरू आहे.

सामंजस्य नसल्यामुळे अनेक लग्न मोडतात. त्यामुळे सामंजस्य, विश्वास हा प्रेमाचा पाया आहे. तो आधी घट्ट करणे महत्त्वाचे आहे, असे ॲड. प्रसाद पाटील यांनी भाष्य केले.

लग्नातील विधींवर खर्च करण्यापेक्षा जास्त विचार हा सहजीवनावर होणे अपेक्षित असते. परंतु, हेच कुठेतरी हरवताना दिसत आहे, असे मत प्रा. सुजाता पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

(९३५६६९६८७७)



# पहिल्या भेटीचे गुलाबी क्षण..

**अमोल सांबरे, पालघर**

एका युवकाची आणि एक मुलीची कोकणातील एका पेपरच्या सदरामधील 'संदेसा आता है' एसएमएसवरुन ओळख झाली. त्यानंतर एसएमएसच्या माध्यमातून रोजच बोलणं सुरु झालं. ती त्यावेळेस नुकतीच महाविद्यालयीन परीक्षा पास झाली होती. तिने ही नुकतेच २१ व्या वर्षात पदार्पण केले होते. तिचे स्वप्नाच्या दुनियेत हरवून जाण्याचे ते गुलाबी क्षण..

साध्या मोबाईलचा जमाना होता तो. एसएसएसवर रोजच बोलता-बोलता ते एवढे चांगले मित्र झाले, की एकमेकांशी गप्पा मारल्याशिवाय ते राहात नसत. रोज सकाळी, दुपारी, संध्याकाळी तोही तिच्याच विचारात आणि ती त्याच्याच विचारात असायची. दिवस कसे भुरकन उडून चालले होते. दोघेपण एकमेकांत गुरफटत चालले होते. या काळात अनेक वेळा भांडणं आणि पुन्हा मैत्री असे घडू लागले. किमान एक वर्ष हे असच चालू होतं. परंतु, त्या युवकाने तिला कधीच प्रेमाविषयी सांगितले नाही. परंतु, तो तिच्यावर जीवापाड प्रेम करू लागला होता. तिला न बघता तिच्या सौंदर्याचे चित्र तो आपल्या हृदयात रेखाटू लागला होता. आणि, एक दिवस त्या मुलाने चक्क हिंमत करुन तिला विचारले, तू माझ्यावर प्रेम करतेस? दोघांनी एकमेकांना समोरासमोर कधीच पाहिले नव्हते. पण, दोघ एकमेकांत इतकी गुरफटले होते, की जगाचे भानच त्यांना उरले नव्हते. एके दिवशी ठरवले, पोस्टाद्वारे एकमेकांचे फोटो पाठवून दोघांचे स्वप्नरूपी चेहरे पहायचे.

एक वर्षानंतर तो क्षण आलाच. त्याच्या स्वप्नातील ती परी त्याला भेटली होती, तर तिलाही तो स्वप्नातील राजकुमार भेटला होता. फक्त फोटो पाहिले होते. दोन्ही बाजूंनी होकार मिळाला आणि रोजचा 'गुड मॉर्निंग' हा शब्द 'आय लव्ह यू'कडे वळला... हळूहळू फोनवर बोलणं चालू झालं. तो नेहमी तिला म्हणायचा बऱ्याच जणांचे प्यार आँखोसे शुरू होकर दिल में उतर जाता है, लेकिन हमारा एसएमएससे शुरू होकर दिल में उतर गया है. प्रेमाच्या १५ महिन्यांनंतर एके दिवशी दोघांनी भेटण्याचे ठरवले. तो दिवस होता, १४ फेब्रुवारी म्हणजेच व्हॅलेंटाईन डे.

प्रेमाची बातमी चक्क मुलीच्या आईला समजली, पण कोणी एवढं मनावर नाही घेतलं.त्या मुलानेही ठरविले, की आपण भेटायला जायचे. तो रायगडवरुन रत्नागिरीकडे निघाला. दोघांनाही एकीकडे प्रेमाचे अश्रू आणि पहिल्या भेटीची भीती वाटू लागली.. भेटीचे ठिकाण ठरले, रत्नागिरी स्टेशन. तोही ट्रेनने पोहोचला. दोघांनी एकमेकाला पाहिले नव्हते. तो रत्नागिरी स्टेशनवर वेड्यासारखा सैरभैर होऊन तिला शोधू लागला होता. अखेर ती त्याला भेटलीच. रेड टॉप, जिन्स आणि हातात सॅग घेतलेली. वा! तो खुश झाला. त्याचा आनंद गगनात मावत नव्हता. त्याने तिला ओळखले. त्याने तिच्या जवळ धावत जाऊन तिचा हाताच पकडला. त्याच्या डोळ्यातले आनंदाश्रू तो लपविण्याचा प्रयत्न करत होता. तीही खूप खुश झाली. जणू दोघांचा जन्म एकमेकांसाठीच झाला आहे. जगाचे भानच दोघांना उरले नव्हते. त्या पहिल्या भेटीच्या साक्षीला असलेल्या खुणा त्या रत्नागिरीच्या स्टेशनवर साक्ष देत आहेत. मोठे घड्याळ त्याच्याखाली.. दोघेही एकमेकांचे हात हातात घेऊन पाहात बसले होते..त्याने अलगद भर स्टेशनवर तिला कडकडून मिठीत घेतलं. १४ फेब्रुवारीच्या आठवणीतील पहिल्या भेटीचे.. गुलाबी भेटीचे.. गुलाबी क्षण.. (९२७०२६६६९६)

# अशी जुळली 'रेशीमगाठ'

**प्रतीक कोळी, रेवदंडा**

भारताची आर्थिक राजधारी असलेली मुंबई म्हणजे स्वप्नांची मायानगरी. रोजगार, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, शिक्षण अशा विविध कारणांसाठी गावठिकाणच्या लोकांचा ओढा हा शहराकडे असतो. शहर असो वा गाव, कर्त्यांचे आयुष्य हे धकाधकीचेच. आणि याच धकाधकीच्या आयुष्यात झालेली अनपेक्षित ओळख एका नवीन नात्याला जन्म देत असते.

दादर या ठिकाणी वाढलेला एक तरुण घरच्यांच्या, परिसरातील लोकांच्या नकारात्मक बोलण्याला, सातत्याने दिल्या जाणाऱ्या टोमण्याला आणि कौटुंबिक खटक्यांना कंटाळतो. मनातील नैराश्य त्याला आत्मघाताला प्रवृत्त करते आणि अखेर तो रेल्वेखाली चिरडून मरण्याचा निर्णय घेतो. या निर्णयाला मूर्तरुप देण्यासाठी तो रेल्वेस्थानकावर जातो आणि तिथे रेवदंडा या ग्रामीण भागातून रोजगारासाठी आलेली एक तरुणी त्याला वाचवते. ग्राम्यभाषेत त्याला नवीन दृष्टी देते आणि आपला हा मार्गदर्शक, आपला जोडीदार असावा, या विचाराने पुढचा-मागचा विचार न करता हा तरुण तिथेच त्या तरुणीला प्रेमाची गळ घालत, लग्नाची मागणी घालतो. एखाद्या चित्रपट किंवा मालिकांसारखी वाटणारी ही कथा खऱ्या अर्थी घडली ती १९८९-९० साली, मुंबईमधील विक्रोळी (पू.) रेल्वे स्थानकात. अर्थात, एकाकी मागणी आल्यानंतर धास्तावलेली ती तरुणी तिथून तडकाफडकी निघून गेली खरी; पण पुढे ही 'प्रीत' फुलली. घरच्यांचा, समाजाचा विरोध पत्करुन दोघेही विवाहबद्ध झाले आणि हे दाम्पत्य रेवंदडा, मोठा कोळीवाडा येथे स्थायिक झाले. हे दाम्पत्य म्हणजे श्री व सौ शुभांगी विजय कोळी. आजघडीस त्यांच्या या संसाराला ३० वर्षे झाली असून, उभयतांनी संघर्ष करत आपल्या परीने संसार फुलवला. 'व्हॅलेंटाईन डे'च्या निमित्ताने त्यांनी दिलेला हा आठवणींना उजाळा.

(७८७५९५०३६६)



■ मांडणी सजावट : केदार गुरव

## संपादकीय


# निर्भय उद्योजक

बजाज ऑटोचे चेअरमन आणि ज्येष्ठ उद्योजक राहुल बजाज यांचे व्यक्तिमत्त्व अन्य भारतीय उद्योजकांत विलक्षण उठून दिसायचे आणि वेगळे ठसायचे. त्यांना बोलताना ऐकणे हा एकाच वेळी मनापासून बोलणाऱ्या शहाण्या माणसाचा अनुभव असायचा त्याचबरोबर त्यांच्यातील अस्वस्थ अँग्री यंग मॅन ही दिसायचा. याचे मुख्य कारण हेच असावे की आपण उद्योजक आहोत, आपला उद्योग पुढे कसा जाईल यावर लक्ष ठेवून त्याच्या आड येणाऱ्या, नुकसानकारक ठरु शकणाऱ्या वादात विनाकारण पडू नये, असे वाटण्याच्या परंपरेत ते बंडखोरच होते असे म्हणायला हवे. कारण, ते कोणाचाही मुलाहिजा न ठेवता जे त्यांना वाटते ती बाब ते स्पष्टपणे, कोणताही आडपडदा न ठेवता बोलत. हे त्यांचे वैशिष्ट्य अगदी शेवटपर्यंत दिसून आले. त्यांनी जी भूमिका घेतली, त्याची बाजू ते कायम हिरीरीने मांडत राहिले. त्यामुळे ते अनेक उद्योजकांप्रमाणे प्रसारमाध्यमांपासून लांब किंवा सोयीचे सुरक्षित अंतर राखून वावरले नाहीत तर जाहीर कार्यक्रम ते टीव्हीवरील वादळी चर्चा यात ते सतत सामील राहिले. अलिकडे गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबतच्या जाहीर कार्यक्रमात बोलताना त्यांनी, आम्ही तुमच्यावर टीका केली तर तुम्हाला चालेल याबद्दल मला खात्री नाही; काँग्रेसच्या काळात आम्ही कोणावरही टीका करू शकायचो, असे ते स्पष्टपणे म्हणाले होते. तसेच, ते पूर्वीही तितकेच स्पष्टोक्ते होते. मात्र त्यांच्या बोलण्यात किंवा राजकारण्यांवरील टीकेत कधी कर कमी करायला हवा आदी गोष्टी नसायच्या. त्यांनी केवळ वादासाठी वाद म्हणून नुसत्या चर्चा केल्या नाहीत, तर बजाज ऑटोच्या निमित्ताने एका उद्योगाला महान संस्थेत रुपांतरीत केले. त्यांची व्यावसायिक मूल्ये उच्च दर्जाची असल्यामुळेच ते म्हणू शकत की, मी घाबरत नाही, मला घाबरण्याची गरज नाही. मी रात्री व्यवस्थित झोपतो. त्यांच्या निधनानंतर त्यांना श्रद्धांजली वाहताना ज्येष्ठ उद्योजक हर्ष गोयंका यांनी पाठीच्या ताठ कण्याची एक्सरे प्रतिमा टाकून ट्वीट केले की असा ताठ कणा असलेला एकमेव उद्योजक म्हणजे राहुल बजाज. सवलती मिळवण्यापासून मार्ग सुकर करण्यापर्यंत अनेक प्रकारच्या उपकारांची सोय करून घेण्यासाठी उद्योजक सरकारपुढे वाकलेले असतात, या प्रतिमेवर त्यांनी जबरदस्त प्रहार केला होता. करसवलती आदींच्या मागे जाण्यापेक्षा महान संस्थांची उभारणी करा, असा त्यांचा सल्ला असायचा. त्याद्वारे त्यांनी अनेक उद्योजकांना घडविले देखील. या साऱ्यांची मुळे त्यांचे आजोबा जमनालाल बजाज यांच्या संस्कारात रुजलेली असू शकतात. गांधीवादी उद्योजक म्हणून ते ओळखले जात आणि महात्मा गांधी त्यांना आपला पाचवा पुत्र मानत. राहुल बजाज हेही हीच मूल्ये स्वीकारून पुढे गेले. कोलकाता येथे जन्मलेले राहुल बजाज भारतात पदवीधर बनल्यानंतर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेले. तेथे त्यांनी कायद्याची तसेच प्रतिष्ठित हार्वर्ड विद्यापीठातून एमबीएची पदवी मिळवली. त्यांनी बजाज स्कूटरला देशातील लोकप्रिय ब्रँड बनवला. त्यांची ऐंशी, नव्वदच्या दशकातील 'हमारा बजाज' ही जाहिरात मोहीम त्यांच्या मूल्यांशी जोडली गेल्याने ती आजही लोकांना आठवते. त्यांच्या चेतक या स्कुटर ब्रँडसाठी आठ ते दहा वर्षांचे वेटिंग असायचे आणि त्याचे पैसे आगावू भरून त्याची नोंदणी करावी लागायची. ही नोंदणीही डॉलरमध्ये करावी लागायची. चेतक स्कुटरची आठ ते दहा हजाराच्या किंमतीवर लोक दोन ते चार हजार रुपये जास्ती देऊन विकत घेण्यास तयार असायचे. आजही लोकांकडे या स्कुटर्स टिकवून ठेवलेल्या दिसतील. त्यांनी आपल्या संस्थेला आपल्या उत्कृष्ट उत्पादनाच्या माध्यमातून महान केले आणि त्याला आर्थिकदृष्ट्या सशक्त केले. जेव्हा भारतातच कारखाना काढणे आणि चालवणे आव्हानात्मक होते तेव्हा त्यांनी परदेशात कारखाने काढले. ते ज्या संस्थांशी जोडले गेले, त्या संस्था त्यांनी मूल्यात्मकदृष्ट्या तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम केल्या. आज सगळीकडे राष्ट्रवाद हा शब्द प्रचलित आहे, पण तो त्यांनी आपल्या हयातभर पाळला. भारतीय उद्योग परदेशी उद्योगांशी स्पर्धा करण्याच्या परिस्थितीत नाही, म्हणून त्यांनी खाजगीकरण आणि जागतिकीकरणाला विरोध केला होता. तसेच, अशोक लेलँड हा ट्रक व्यवसाय खरेदी करण्याचा प्रयत्नही केला होता. दोन्हीत त्यांना अपयश आले. तरी दुःख असो वा विषाद. त्यांच्या जे मनात आहे ते ओठांत येण्याचे काही थांबले नाही. तसेच, त्यांचा साधेपणाही एक दुर्लक्षित राहिलेला पण मूळ संस्कारांशी नाते सागणारा एक पैलू होता. त्यांना विनम्र आदरांजली!

# दिवस प्रेमाचा, मानव जातीचा!



मोहिनी गोरे



**प्रेम म्हणजे प्रेमच असतं;**
**प्रत्येकाचेच प्रेम असते,**
**आपल्या माणसांवर देशांवर आणि मूल्यांवर,**
**गरीबीत एक भाकरी दोघांनी खाण्यात प्रेम असते,**
**मूनलाईट कॅण्डल डिनरमध्येही प्रेमच असते,**
**साम्राज्यवादात पारतंत्र्यात ही प्रेम केले आम्ही,**
**पारतंत्र्याचे साखळदंड तुटल्याचा आवाज ऐकला आम्ही,**
**खुलेआम प्रेम करण्याचा अधिकार दिलाय संविधानाने,**
**प्रेम करतो आम्ही आई-वडिलांवर पती-पत्नी अपत्यावर, बहीण भावावर मैत्र तर आहे समस्त मानवजातीबरोबर,**
**माहित आहे तुमचा परिवार नाही बनणार आम्ही,**
**पण कुटुंब आणि वसुधैव कुटुंबकमही आमचेच,**
**आहेत आमचे आधुनिक विचार आणि आचार,**
**त्याचसाठी हक्क मानतो परवडणारे पेट्रोल डिझेल घर, पाणी रस्ता अभिव्यक्ती स्वातंत्र्य आरोग्य रोजगार,**
**पृथ्वीचे रहिवासी आमचं दुसरं तिसरं असं काही नसतं**
**फक्त प्रेम म्हणजे प्रेमच असतं.**

प्रेमाचा दिवस, valentine day असं ठरवून, त्या दिवशीच आणि तेव्हाच प्रेम करता येत नाही. हे काहीतरीच पाश्चिमात्य फॅड असा सूर लावला जातो. माणूस समाजप्रिय व उत्सवप्रिय ही असतो. आपल्याकडे तर अगदी ऋतुमानानुसार प्रत्येक महिन्यागणिक प्रत्येक नातेसंबंधाचे महत्व म्हणून असे किती तरी सण-उत्सव आहेत. मग हे असं व्हॅलेंटाईन डेप्रेमाचा दिवस हवा कशाला? आमच्याकडे खजुराहो शिल्प आहेत. आम्ही आई-वडिलांवर, भाऊ-बहिणी बहिणी-बहिणी, अपत्य प्रेम, पति-पत्नी, मित्र-मैत्रिणी ही अशी रक्ताचीच नव्हे तर इतरही प्रेमाची नाती आहेतच ना. त्यासाठी हे प्रदर्शन कशाला? खरं म्हणजे या दिवसाची आठवण मार्केटींग तंत्रामुळे सर्वांना होते. परंतु आजचा माहोल, आपला आसपास, समाजभान पाहता प्रेम म्हणजे अत्यंत प्रामाणिकपणे व जबाबदारीने करण्याचं, जगण्यासाठी आवश्यक असणारी, सहेतुक जगण्याला निमित्त देते हे सांगाव लागत असल्याचा काळ आहे. प्रेम स्वतःबरोबर, घरातील इतरांची काळजी घ्यायला शिकविते. जीवन सुंदर करते. त्यादृष्टीने बोलते होणे गरजेचं आहे.

प्रेम, प्रीति, इश्क, मुहब्बत, लव्ह यांचा विचार करता आपण अगदी दोन्ही बाजूनी बोलू शकतो,

**इश्क ने गालिब**
**निकम्मा कर दिया**
**वरना हम भी आदमी थे काम के**

**त्याचवेळी प्रेमासंबंधी दुसऱ्या बाजूने म्हणता येते की---**

**इश्क जब तक ना कर चुके रुसवा**
**आदमी काम का नही होता.**

व्हॅलेंटाईन डे निमित्ताने म्हणा किंवा हिवाळ्यातील आल्हाददायक, उत्साही आणि उत्सवी वातावरणाचा महिना म्हणूनही चालेल आपण आपल्या स्वतःबरोबर घरातील प्रत्येक सदस्यांशी व इतरांशी ही संवाद साधला पाहिजे. आपण भारतीय कुटुंब आणि परिवाराला मानणारे, जपणारे, त्यांच्यावर प्रेम करणारे. कुटुंब म्हणजेच समाजाचं छोटे युनिट. कुटुंबातीलच स्त्री सदस्यांच्या अडचणी, बाहेरील जगताकडून वाट्याला येणारे अपमान, छेडछाड यावर बोललं की मनही मोकळं होतं मार्गही दिसतो. आपलं दुःख आपल्या पत्नीचे दुःख घरातील सदस्यांचे दुःख तेच इतरांचंही दुःख आहे लक्षात येतं आणि माणूस संवेदनशील होतो. संवेदनशील माणूस मग दुसऱ्यांच्या दुःखाचं, अपमानाचं कारण ठरणार नाही. प्रेमासाठी संवेदनशील असणे अपरिहार्यच. प्रेम म्हणजे केवळ लैंगिक भावना नाही तर नातेसंबंधातील सुधार, माणसा-माणसातील सशक्त नातं, माणुसकीची नाती आणि मानवताधर्माचे पालन म्हणजेच प्रेम होय. पाच हजार वर्षाची ऐतिहासिक परंपरा असलेला भारत हा अतिप्राचीन सनातन देश म्हणजेच प्रदिर्घ संस्कृती असलेला देश. आपल्या इतिहासाकडे पाहताना हजारो वर्ष अत्यंत हिणकस अशा स्वयंघोषित उच्चवर्णीयांनी, सरंजामशाही वृत्तीने केलेल्या सामाजिक आणि आर्थिक शोषणाचा इतिहास आणि त्यासाठी सर्वसामान्यांनी केलेला संघर्ष आहे. सर्वसामान्यांनी केलेले प्रचंड श्रम, कष्ट, त्याग, घेतलेली उत्पादने, नवनिर्मिती अचंबित करणारी आहे परंतु लेखणी मोजक्याच लोकांच्या हाती असल्याने त्यांनी सोयीस्कर इतिहास लिहिला. भारत देश म्हटलं की बुद्धांचा भारत, गांधींचा भारत, संत परंपरा असलेला भारत, विविधतेत एकता असलेला भारत आणि हे सर्व टिकवण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजेच आपली संस्कृती आणि इतिहास. गंगा-जमुना संस्कृती म्हणजेच परस्परांवर प्रेम. सहिष्णुता आणि एकमेका सहकार्य करू आणि प्रेम देऊ आणि घेऊही. दुर्दैवाने आज देशाचे वास्तव म्हणजे केवळ एक आभासी शत्रू निर्माण करून जगण्याचे, वास्तवातले आणि कळीचे प्रश्न बाजूला सारून व भावनिक होऊन पसरविलेला जातीय-धार्मिक तेढ, हाताला व डोक्याला चालना देणारा रोजगार व नोकरी नसलेला प्रचंड मोठा तरुण वर्ग, स्त्री-पुरुष असमानता, देशाची नैसर्गिक संसाधन, संपत्ती १४५ उद्योगपती घराण्याकडे आणि त्यासाठी भरपगारी राबणारे शासन-प्रशासन, नेते-पुढारी, व्यवस्था-यंत्रणा इतकी भयानक पोखरली आहे की तिचा भेसूर व भयभीत चेहरा पाहून मन बेचैन व अस्वस्थ होते. असं वास्तव असताना तुम्ही आम्ही अशा सर्वांनी मिळून देश आणि समाजात जाणूनबुजून पसरविलेली घृणा, द्वेष, तिरस्कार, असूया यांच्या तटबंदी भिंती तोडून परस्पर सौहार्द, सौजन्य, सहकार्य, समन्वय आणि प्रेमाची रोपटी पुन्हा रुजवावी लागतील.

प्राचीन परंपरा आणि संस्कृती असलेल्या भारतात श्रेष्ठ-कनिष्ठ सामाजिक अवस्थेत विभागलेला समाज अज्ञान, दारिद्र्य आणि मागासलेपणातच खिचपत पडला आहे कारण सरंजामशाही, भांडवलशाही आणि पुरोहितशाही वृत्तीने वेगवेगळे नाव व भिन्नभिन्न रूप, मुखवटे धारण करून केलेले आर्थिक शोषण हेच महत्त्वपूर्ण कारण आहे. सन्मानाने, प्रतिष्ठेने, सद्भावनेने, सकारात्मकतेने, माणूस म्हणून प्रेमाने जगण्याचा अधिकार दिला तो लोकशाही आणि राज्य घटनेने. मानवताधर्मावर, प्रेमधर्मावर, स्त्री-पुरुष समानतेवर, मानवी मूल्यांवर प्रेम करायला शिकवले ते सावित्रीबाई, महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, आगरकर, भगतसिंग, महात्मा गांधी, शिवाजी महाराज, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर इत्यादी अनेकानेक मान्यवरांनी. ताराबाई शिंदे यांनी तर स्त्री पुरुष तुलना या ग्रंथात दुटप्पी पुरुषप्रधान मानसिकतेचे वास्तव रेखाटले आहे. आज स्त्रियाच नव्हे तर पुरुषांच्याही स्वातंत्र्याचा, प्रेमाचा संकोच होत आहे. भीतीदायक वातावरण निर्माण झालं आहे. जिथे जगण्याचीच भ्रांत तिथे प्रेम कधी करणार? असं सगळं वातावरण. म्हणून या काळोखातून वाट काढताच येणार नाहीच का असं वाटण्याचा हा काळ आहे. असं असलं तरी अनेक मोठ्या जमेच्या बाजूही आहेत. जगामध्ये तरुणांची संख्या जास्त असलेला तरुण देश म्हणजेच भारत देश. इतका तरुण की त्याचे सरासरी वय अवघे साडे अठ्ठावीस वर्ष. हे तरुण वय म्हणजेच साहसी, अन्याय, अत्याचार, मान्य न करणारे, दुर्दम्य इच्छाशक्ती, प्रेमशक्ती असलेले, प्रसंगी बंडखोरी करणारे हे वय. तेव्हा एकत्र येत लोकशाही मार्गाने सर्वांनाच प्रेमाने, आनंदाने जगण्यासाठी निरोगी व स्वास्थ्यवर्धक वातावरण आवश्यक आहे हे ठणकावून सांगावे लागेल. हे करता येणे शक्यही आहे कारण हे जग चालतं ते विश्वासावर, नैतिक मूल्यावरील प्रेम, देशावर असलेले प्रेमावर एकंदरीतच मानवजातीवर असलेल्या प्रेमावरच.

समाजाने योजलेल्या लिंगभेदाच्या बंधनापलिकडे आपण स्त्रीचा माणूस म्हणून आणि पुरुषाचा देखील माणूस म्हणून विचार करावा लागेल. प्रेम हेच परिवर्तन करू शकतं, बदल घडवू शकतं, समानतेचा समाज निर्माण करू शकतो. प्रेम क्रांती घडवू शकते. तेव्हा आज आपण स्त्री-पुरुष सुदृढ, सशक्त आणि निरोगी नातं बनण्यासाठी बोलत राहणं म्हणजे चुकीच्या मतांवर, वागण्यावर खुलेपणाने बोलणे त्या सुधारत पुढे जाणे गरजेचे आहे. संवादी राहणे एकमेकांच्या मताचा आदर सन्मान करणे हे निश्चितच प्रेमाने करू शकतो. अहिंसा आणि प्रेमाच्या मार्गाने एकत्र यायला कायद्याची ना नाही. परंतु प्रेमावर घाला घालणाऱ्यावर, सामाजिक असुरक्षितता निर्माण करणाऱ्यांवर मात्र कायद्याची हरकत आहे हे महत्त्वाचे. आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन इंटरनेटमुळे आपल्याला एकत्र येणे, प्रबोधन करणे, स्त्री-पुरुष निकोप वातावरण तयार करण्यासाठी इतरांशी जोडून घेत जे चांगलं आहे, मानव प्रेमाच आहे, उपयोगाचं आहे ते ते घेता येऊ शकतं. सोशल मीडियाचा सकारात्मकपणे वापर करत एकाच वेळी फार मोठ्या प्रमाणात पूर्ण देशभरच नव्हे तर विश्वाशी नातं जोडायला नक्कीच उपयोग करता येईल. कारण प्रेम ही भावना सुद्धा लोकल ही आहे आणि ग्लोबल ही आहे. याचीच ग्वाही देणारी मा.क.वळंज यांची कविता

**नव्या जडणघडणीचे आम्ही**
**दीपस्तंभ ठरुया**
**दंभ कटुता अवहेलना सर्वत्र**
**तिरस्कारुया**
**मता सद्भाव विश्वबंधुत्व**
**पुरस्कारुया**
**नव्या दमाने नव्या दिलाने**
**सर्वांना मिळवूया**
**विश्वामधल्या दीन जनांचे**
**अश्रू पुसूया**
**अखंड दुर्बल पतीतांचे**
**जयगान गाऊया**
**नव्या मानवाची**
**यशोपताका नभी भिडवूया**

# लैला-मजनू ते व्हॅलेंटाइन

जागतिकीकरणामुळे दूरचित्रवाणी, मोबाइल, इंटरनेट यांचा वापर वाढला. पाश्चिमात्य संस्कृतीचे वारे वाहू लागले. पाश्चिमात्य जीवनशैलीचा या सर्वांचा प्रभाव आपल्यावर पडू लागला. विदेशात साजरे होणारे विविध डे आपल्या देशातही साजरे होऊ लागले. लैला-मजनू, यांच्या प्रेमकहाण्यांचा पगडा महाविद्यालयीन तरुण-तरुणींवर मोठ्या प्रमाणात असतो. सळसळते रक्त असल्याने सर्व हवेहवेसे वाटते, त्यामुळे व्हॅलेंटाइन डेची जणू वाटच पाहत असतात. प्रेमाची संकल्पना बदलण्यात प्रसारमाध्यमांचा फार मोठा वाटा आहे. लैला-मजनूचे प्रेम व्यक्त करण्यासाठी कोणत्या व्हॅलेंटाइन डेचीच गरज भासत नव्हती. आपण ज्याच्यावर प्रेम करतो, ते व्यक्त करण्यासाठी कोणत्या दिवसाची वाट पाहण्याची गरज नाही. खरे प्रेम करणाऱ्या व्यक्तीला त्याची गरजही भासत नाही. आजच्या तरुण पिढीला प्रेमाच्या कल्पना काय? तो स्मार्ट, ती सुंदर. त्याला ती आवडली आणि तिलाही तो आवडला. एकमेकांच्या गळ्यात हात घालून फिरले. यौवनाचा आनंद घेतला म्हणजे प्रेमात पडलो, अशी समजूत होते. घरच्यांचा विरोध पत्करून प्रेमविवाहही होतो. एकत्र राहिल्यावर आवडीनिवडीवरून वाद होतात. दोघांचा अहंकार मोठा होतो. क्षुल्लक कारणावरून भांडणं होतात. प्रकरण घटस्फोटापर्यंत जाते. प्रेमाची बदलणारी संकल्पना आपल्या आयुष्यावर कशा रीतीने परिणाम करू शकते, याची जाणीव होणे गरजेचे आहे. मनुष्याने प्रेम करावे ते निःस्वार्थपणे. निःस्वार्थी प्रेमात आपल्या हवे ते मिळाले पाहिजे ही भावना नसते. त्या प्रेमात त्यागाची भावना असते. आपले प्रेम आपल्याला मिळाले नाही म्हणून काय झाले, ती किंवा तो आयुष्यभर आनंदी राहो, अशी भावना खऱ्या प्रेमात असते. याचाच अर्थ लग्नाआधी प्रेम करू नका, असे नाही. प्रेम अवश्य करा; पण प्रेमात पडत आहे, असे वाटत असेल तर आपले डोळे उघडा. स्वतःलाच आधी प्रश्न करा. या प्रेमात आपला स्वार्थ तर नाही ना? त्याच्या वा तिच्यासाठी आपण आपला अहंकार, अभिमान आदींचा त्याग करू शकतो का? उत्तर होय असेल तरच पुढे पाऊल उचला.

**यारा-वारा**
**वैभव पाटील**

# वणवे थांबवा वन्यजीव वाचवा

उन्हाळ्यात वणवा लागण्याच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या आगीत अनेक वनौषधी, सरपटणारे प्राणी, कीटक, तृणभक्षी प्राणी, त्यांची अंडी, घरटी जळून खाक होत असून, अंडी व घरटी जळाल्याने अनेक पक्षी त्या आगीत प्राणाची आहुती देतात. याबाबत जनजागृती चळवळ उभारण्याची गरज आहे. हे वणवे पावसाळ्यात गवत चांगले यावे, म्हणून लावले जातात. काही जण सहज जाताजाता विडी, सिगारेट पेटवून टाकतात त्यामुळे आगी लागतात. काही जण केवळ हौस म्हणून आग लावतात, तर काही जण शेतातील पालापाचोळा जाळण्यासाठी आग लावतात. तीच आग आटोक्यात न आल्यास इतर ठिकाणी आगी लागतात. नैसर्गिकरित्या किंवा मानवांच्या करणीमुळे जिल्ह्यातील जंगलपरिसरात लागलेल्या आगीच्या घटना काही नवीन नाहीत. मात्र मानवी हव्यास, सातत्याने बदलणारे ऋतुमान अशा विविध कारणांमुळे जंगल परिसरात लागणाऱ्या वणव्यांचे प्रमाण वाढत जात असून, यामुळे जिल्ह्यातील वनसंपदेवर आघात वारंवार आघात होत आहेत. या विनाशकारी घटनांमुळे वनातील पशूपक्षी तसेच अन्य सजीवांसह आदिवासी समाजाचाही आदिवास धोक्यात येत आहे. रायगड जिल्ह्याला नैसर्गिक, ऐतिहासिक, धार्मिक, आधुनिक असा संमिश्र वारसा लाभला आहे. मात्र, दिवसागणिक नैसर्गिक आणि ऐतिहासिक वारसा वणव्यांमुळे धोक्यात येत आहे. माकडे, वानरे व पक्ष्यांच्या अन्नाचा प्रश्न निर्माण झाला. तसेच त्यांचा अधिवास देखील नष्ट झाला. पावसाळ्यात जिल्ह्यातील डोंगर, माळरान, किल्ले, गड, जंगल या सर्व ठिकाणी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात छोटी झुडपे व गवत उगवते. ऑक्टोंबरनंतर वाढत्या उष्म्याने ही झुडप व गवत सुकते आणि अशा माळरान, डोंगर व शेतात सुकलेल्या झुडप व गवताला नैसर्गिकरीत्या वणवा लागतो, तर काही लोक कळत-नकळत आग लावतात. या आगीचे रुपांतर प्रचंड नैसर्गिक व कृत्रिम वणव्यात होते.



# भगवद्गीता

**अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।**
**विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ।।१७।।**

अविनाशि- नाशरहित; तु- परंतु; तत् विद्धि- ते जाणून घे; येन-ज्याने; सर्वम्- संपूर्ण शरीर; इदम्- हे; ततम्- व्यापलेले आहे; विनाशम्- विनाश; अव्ययस्य- जे अविनाशी आहे त्याचे; अस्य- या; न कश्चित्- कोणालाही नाही; कर्तुम्- करणे; अर्हति- शक्य.

जे संपूर्ण शरीराला व्यापून आहे ते अविनाशी आहे असे तू जाण. त्या अविनाशी आत्म्याचा कोणीही नाश करु शकत नाही.

तात्पर्य : या श्लोकामध्ये, संपूर्ण शरीर व्याप्त करणाऱ्या जीवात्म्याच्या स्वरुपाचे विश्लेषण करुन सांगण्यात आले आहे. संपूर्ण शरीरात चैतन्य पसरलेले आहे हे कोणीही जाणू शकतो. शरीराला अंश किंवा पूर्णरुपामध्ये होणाऱ्या सुखदुःखांची जाणीव प्रत्येकाला असते. हा चैतन्याचा प्रभाव प्रत्येकाच्या स्वतःच्या शरीरापुरताच मर्यादित असतो. एका शरीराच्या सुखदुःखाची जाणीव आणि जीवात्म्याच्या शरीरातील उपस्तितीचे लक्षण हे व्यक्तिगत चेतनेद्वारे कळून येते. या जीवाचे परिमाण केसाच्या वरच्या अग्राच्या एक दशसहग्रस्त्रांशाइतके आहे असे सांगण्यात येते; याची पुष्टी श्वेताश्वतरोपनिषदात करण्यात आली आहे.

**बालाग्रशतभागस्य शतधा कल्पितस्य च ।**
**भागो जीवः स विज्ञेयः स चानन्ताय कल्पते ।।**

'केसाच्या वरच्या अग्राचे शंभर भागांमध्ये विभाजन केले आणि अशा प्रत्येक भागाचे पुन्हा शंभर भाग केले तर असा प्रत्येक भाग हा जीवाच्या आकाराचा परिणाण होईल.' याच प्रकारचे प्रतिपादन पुढील श्लोकातही आढळते.

**केशाग्रतशतभागस्य शतांशः सादृशात्मकः ।**
**जीवः सूक्ष्मस्वरुपोऽयं संख्यातीतो हि चित्कणः ।।**

'आध्यात्मिक चित्कण संख्यातीत आहे व त्यांचे परिमाण (आकार) हे केसाच्या अग्रभागाच्या एक दशसहस्त्रांशाइतके आहे.'

म्हणून व्यक्तिगत आत्मारुपी चित्कण हा भौतिक अणूपेक्षाही सूक्ष्म आहे आणि असे असंख्य चित्कण आहेत. हे अतिसूक्ष्म आध्यात्मिक स्फुलिंग म्हणजे भौतिक शरीराचे आधारभूत तत्व आहे आणि ज्याप्रमाणे एखाद्या औषधातील कार्यकारी तत्वाचा प्रभाव पूर्ण शरीरभर पसरतो त्याचप्रमाणे या आध्यात्मिक स्फुलिंगाचा प्रभाव संपूर्ण शरीरभर पसरतो. जीवात्म्याचा हा ओघ संपूर्ण शरीरभर चेतनारुपाने अनुभवास येतो आणि हा अनुभव म्हणजेच जीवात्म्याच्या अस्तित्वाचा पुरावा आहे. चेतनाविरहीत भौतिक शरीर म्हणजे मृत शरीर हे कोणतीही सामान्य व्यक्ती समजू शकते आणि कोणत्याही भौतिक प्रक्रियेद्वारे या चेतनेचे शरीरामध्ये पुनरुत्थान करता येत नाही. म्हणून चेतना ही कोणत्याही भौतिक गोष्टीच्या संमिश्रणामुळे नसून आत्म्यामुळे असते. मुण्डकोपनिषदामध्ये आण्विक जीवात्म्याच्या परिमाणासंबंधी अधिक विश्लेषण करण्यात आले आहे.

**एषोऽणुरात्मा चेतसा वेदितव्यो यस्मिन्प्राणः पञ्चधा संविवेश । प्राणैश्चितं सर्वमोतं प्रजानां यस्मिन् विशुद्धे विभवत्येष आत्मा ।।**

'आत्म्याचा आकार परमाणुरुप आहे आणि त्याला पूर्ण बुद्धीद्वारेच जाणता येते. हा परमाणुरुप, पाच प्रकारच्या प्राणांत (प्राण, अपान, व्यान, समान आणि उदान) तरंगणारा आत्मा हृदयात स्थित असतो आणि देहधारी जीवांच्या संपूर्ण शरीरावर त्याचा प्रभाव पसरलेला असतो. तेव्हा आत्मा पाच प्रकारच्या भौतिक प्राणांपासून पवित्र होतो तेव्हा त्याचा आध्यात्मिक प्रभाव दुग्गोचर होतो.'

विविध आसनांद्वारे, पवित्र जीवात्म्याला घेरणाऱ्या पाच प्रकारच्या प्राणांचे नियंत्रण करणे हे हठयोगाचे प्रयोजन आहे. हा योग भौतिक लाभाकरीता नसून, सूक्ष्म जीवात्म्याला भौतिक वातावरणाच्या गुंतागुंतीतून मुक्त करण्याकरीता आहे.


(क्रमशः)

# वाहोत प्रेमाचे निर्झर...

उर्मिला राजोपाध्ये

'व्हॅलेंटाईन्स डे' हा अनेकार्थानं महत्त्वपूर्ण असा दिवस. केवळ प्रियकर-प्रेयसीमधील उत्कट प्रेमापुरता मर्यादित आणि संकुचित अर्थ न गृहीत धरता समस्त मानवजातीमधल्या बंधुत्वाशी, स्नेहाशी जोडला जाणारा हा दिवस आपली स्वतंत्र ओळख राखून आहे. संस्कृतीरक्षकांसाठी विरोधाचा, पाश्चात्य संस्कृतीच्या स्तुतीपाठकांसाठी कुरघोडी करण्याची संधी देणारा, बाजारासाठी तेजीचा तर प्रेमीजीवांसाठी प्रेमाच्या अभिव्यक्तीची संधी देणारा यथायोग्य दिवस म्हणजे 'व्हॅलेंटाईन्स डे'! सार्वजनिक बागांमध्ये, कुठल्याशा वळणावर, कॅफेमध्ये, कॉलेजच्या कट्ट्यावर, कँटीनच्या बाकड्यावर, क्लासच्या कॉरिडोरमध्ये तर कधी एखाद्या मैदानाच्या कोपऱ्यामध्ये साजरा होणारा हा दिवस तरुणाईच्या तरल भावना पुरस्कृत करतो, त्यांच्या अभिव्यक्तीचं कारण बनतो. टवटवीत फुलाचं प्रतीक जपत या हृदयीचं त्या हृदयी पोहोचवतो आणि प्रेमाचा मार्ग प्रशस्त करतो. त्यामुळेच नीती, संस्कार आदींचे परंपरावादी पडदे ओलांडून तो प्रत्येक प्रेमळ व्यक्तीला साद घालतो.

प्रणयाची रम्यता आणि स्वप्नीलता असल्यामुळेच प्रेमाचा संदर्भ प्रथम तरुण-तरुणींमधल्या हळूवार नात्याशी जोडला जातो. मात्र प्रेमाचा हा केवळ एक हलकासा पदर आहे हे आपण विसरतो. खरं तर व्हॅलेंटाईन्स डे केवळ तरुणाईचा नसून मनात प्रेमाचा जिवंत झरा जपणाऱ्या प्रत्येकाचा असतो. एका दिवसाचं साजरीकरण केवळ प्रतिकात्मक असतं, कारण प्रेमाचा अंश नाही असा दिवसच पृथ्वीवर कधी उजाडला नाही आणि उजाडणारही नाही. प्रेमाची अदृश्य शक्ती हीच प्रत्येकाच्या जगण्याची प्रेरणा होते आणि ऐलतीरापासून सुरू होणाऱ्या प्रवासात पैलतीरी पोहोचेपर्यंत साथ देते. वयाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रेमाचे नानाविध कंगोरे समोर येतात. त्यांचं दर्शन वयाच्या प्रत्येक वळणावर जाणिवांचा मोहोर फुलवतं आणि जगण्याचा ताटवा बहुरंगाने सजत राहतो.



अशा प्रकारे जाणिवांची, अनुभवांची, परिणामांची साठवणूक करणारं मन अधिकाधिक समृद्ध होतं आणि प्रेम नामक सर्वव्यापी सत्याकडे व्यापक दृष्टीनं पाहू लागतं. म्हणूनच बाल्य, तारुण्य, प्रौढत्व या तीन अवस्थांपेक्षा वार्धक्यात प्रेमाचा खरा अर्थ नेमकेपणाने समजतो. त्या टप्प्यापर्यंत पोहोचणारं प्रेम नवथर नसतं तर स्थिर असतं, शारीरिक आकर्षण ओलांडून मनाच्या तीराला येऊन थडकलेलं असतं. या टप्प्यावर प्रेम या भावनेचं अंतरंग नेमकेपणानं उमगलेलं असतं. खऱ्या अर्थानं प्रेमाची निकड जाणवलेली असते. म्हणूनच तरुणपणात प्रेमाची स्पष्ट कबुली न दिलेला एखादा वृद्ध जीव या दिवशी आपल्या सहचारिणीसाठी आवर्जून गजरा आणतो तेव्हा तो आत्तापर्यंत अव्यक्त राहिलेल्या भावनेचा आवेग असतो. एखादी प्रौढा नवऱ्याने आणलेला लालभडक फुलांचा बुके मुलांसमोर लटक्या रागानं स्वीकारते तेव्हा खरं तर तिचं मन आतून घमघमत असतं. कारण वयाच्या या टप्प्यातही तिला हे मुग्ध प्रेम साद घालत असतं. तरुण-तरुणींचा तर हा हक्काचा दिवस! सध्याच्या सैलावलेल्या वातावरणात त्यांच्या अभिव्यक्तीवर बंधनं असण्याचा प्रश्नच नाही. या दिवशी त्यांचा आनंद आणि हर्ष सगळीकडून भरुन उरलेला असतो. हेच प्रेम वैयक्तिक पातळी ओलांडून कुटुंब आणि समाजाला कवेत घेतं तेव्हा आणखी उदात्त होतं, शाश्वत होतं. ते दोन व्यक्तींपुरतं मर्यादित न राहता अथांग होतं, आकाशासारखं विस्तीर्ण होतं. अलिकडे आपण याचाही अनुभव घेतला.

व्हॅलेंटाईन्स डे निमित्त केवळ मौजमजा अथवा पार्टी करणं हा संकुचित दृष्टिकोन आता बदलत असल्याचं चित्र निश्चितच सकारात्मक आहे. एकीकडे गती हरवलेलं अर्थचक्र पूर्वपदावर आणण्यासाठी लोक कृतीशील होत आहेत तर दुसरीकडे ढासळलेली आणि कोरोनामुळे बाधित झालेली शिक्षणव्यवस्था जागेवर येण्याची वाट पाहणारा पालकवर्ग घरातल्या नवीन पिढीच्या जडणघडणीकडे जाणीवपूर्वक लक्ष घालत आहे. ऑनलाईन शिक्षणाने खिळखिळ्या होण्याच्या उंबरठ्यावर असणाऱ्या या व्यवस्थेला तारलं ते विद्यार्थ्यांवर निरलस प्रेम करणाऱ्या शिक्षकवर्गाने.

त्यामुळेच त्यांनाही प्रेमाचे दूत म्हणणं चुकीचं ठरणार नाही. अगदी दोन वर्षांपूर्वी ऑनलाईन शिक्षण ही पद्धती काही अपवाद वगळता सगळ्यांसाठीच नवी होती. पण अवखळ, अजाण वयातल्या मुलांना स्क्रिनपुढे खुळवून ठेवण्याचं, जाणत्या मुलांना विषयांची गोडी लावण्याचं आणि मोठ्या मुलांमधली शिक्षणाची रुची टिकवून ठेवत स्पर्धात्मक युगासाठी तयार करण्याचं शिवधनुष्य शिक्षकांनी पेललं ते केवळ विद्यार्थी आणि आपल्या पेशावरील प्रेमापोटीच... म्हणूनच दोन वर्षांच्या प्रदीर्घ काळातही शिक्षणाची गंगा वाहती राहिली आणि अनंत अडथळे पार करुन एक पिढी घडत राहिली. ऑनलाईन पद्धतीनं शिक्षण घेतलेले असंख्य चेहरे उद्या बाहेर पडतील आणि समाजाच्या सेवेत रुजु होतील तेव्हा या प्रेमदुतांच्या परिश्रमांचं महत्त्व आपल्याला समजेल. अन्यथा इतक्या प्रचंड संख्येनं असणाऱ्या युवावर्गानं नेमकं काय केलं असतं, त्यांच्यातली निराशा समाजानं कशी स्विकारली असती याचा विचारही करवत नाही. त्यामुळे हा व्हॅलेंटाईन डे शिक्षकांनाही समर्पित असायला हवा.

# अखेर सिंधुदुर्ग मेडिकल कॉलेजला मान्यता

## प्रारंभी १०० विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश
## जिल्हावासीयांचे स्वप्न पूर्ण

। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।

जिल्ह्यात मंजूर झालेल्या शासकीयवैद्यकीयमहाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेचा मार्ग अखेर सुकर झाला आहे. त्यासाठी आवश्यक असलेली कायमची मान्यता मिळाली आहे.

परिणामी यावर्षीपासून शंभर विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. यामुळे जिल्ह्याचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू होऊन जिल्ह्यात डॉक्टर घडण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

शासकीयवैद्यकीयमहाविद्यालय व्हावे, अशी जिल्हावासियांची गेली अनेक वर्षांची मागणी होती. यासाठी निवेदने देणे, पत्र लेखन करून लक्ष वेधणे, अशी आंदोलने करण्यात आली होती. स्थानिक स्वराज्य संस्थांचे ठरावही पाठवण्यात आले होते.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आंगणेवाडी यात्रेनिमित्त जिल्ह्यात आले असता त्यांनी जिल्ह्याच्या समस्या जाणून घेण्यासाठी प्रशासकीय बैठक घेतली होती. यावेळी मुख्यमंत्री ठाकरे यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याचे आश्वासन दिले होते.

राज्य शासनाने त्यानंतर आपल्या स्तरावर जिल्ह्यात असे महाविद्यालय मंजूर करून त्यासाठी आर्थिक तरतूद केली. त्यासाठी स्टाफ पॅटर्न तयार करून तोसुद्धा मंजूर केला होता. यानंतर राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने पाहणी केली. पहिल्या फेरीत पुरेशा सुविधा नसल्याने परवानगी नाकारली होती.




*याबाबत सुरू अधिवेशनात खा. विनायक राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे याकडे लक्ष वेधले होते. त्यामुळे समितीने पुन्हा पाहणी करीत आज पूर्ण व कायमची मान्यता दिली आहे. हे वैद्यकीय महाविद्यालय सुरू होण्यासाठी शासकीय महाविद्यालय कृती समितीने मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले आहेत. प्रत्येक स्तरावर या समितीने पाठपुरावा केला आहे. गेल्या दोन वर्षात यासाठी पालकमंत्री उदय सामंत, खा. विनायक राऊत, आ. वैभव नाईक यांनी पुढाकार घेतला. त्यामुळे अखेर महाविद्यालय विद्यार्थी प्रवेशासह मंजूर झाले आहे.*

दुसऱ्या वेळी पाहणी करून २० सप्टेंबरला परवानगी दिली होती; परंतु अवघ्या दोन दिवसांत परवानगी नाकारण्यात येत त्रुटी दूर करण्यास सांगण्यात आले. त्यानंतर तिसऱ्यावेळी पाहणी झाली. त्यावेळी तर आवश्यक डॉक्टर उपलब्ध नव्हते. त्यामुळे समितीने चौथ्यावेळी पाहणी केली. या पाहणीत समितीला आवश्यक सुविधा उपलब्ध दिसल्याने वैद्यकीय महाविद्यालयाला तत्वतः मान्यता देत उणिवा सहा महिन्यांत दूर करण्याची मुदत दिली होती.

## महत्त्वाचे

### डॉ. विजय माटे यांचा सत्कार

। चिपळूण । प्रतिनिधी ।

श्रीमती रूक्मिणीबाई माटे शिक्षण संस्था, कामथे संचालित बाळासाहेब माटे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातर्फे संस्थेचे अध्यक्ष व कामथे गावचे सरपंच डॉ. विजय माटे यांचा उद्योजक चंद्रकांत भोजने यांच्याकडून सत्कार करण्यात आला आहे.

विजय माटे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत तामिळनाडू येथील युनिव्हर्सल डेव्हलपमेंट कौन्सिलच्यावतीने डॉक्टरेट पदवी देऊन नुकताच यथोचित सन्मान केला. यानिमित्त हा सत्कार करण्यात आला असून, याप्रसंगी मॅनेजिंग डायरेक्टर आशिष गाला, सारस्वत बँकेचे अधिकारी संतोष सावंत, हसमुख हदिया, संजय लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

### आ.भास्कर जाधव यांना पितृशोक

। चिपळूण । प्रतिनिधी ।

जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आणि गुहागर मतदारसंघाचे आमदार भास्करराव जाधव यांचे वडील भाऊराव शिवराम जाधव यांचे तुरंबव येथील निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते.



त्यांच्या पश्चात ३ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडं, नातजावई, नातसुना, पतवंडे असा मोठा परिवार आहे. शेतीची आवड असणाऱ्या भाऊरावांनी आयुष्यातील ८ वर्ष त्यांनी पोलीस खात्यामध्ये सेवा बजावली. पण नोकरीत मन न रमल्याने शेतीबरोबरच स्वतःचा उद्योग-व्यवसाय असावा या निर्धाराने ते गावी आले होते.

# आ.निकम यांच्या हस्ते विकासकामांचे भूमिपूजन

। चिपळूण । प्रतिनिधी ।

तालुक्यातील कोंढे-करंबवणे मार्ग, कोंढे-शिरळ पूल पुनर्बांधणी या विकासकामांसाठी कोट्यावधीचा निधी मंजूर झाला असून, या विकासकामांचे भूमिपूजन १३ फेब्रुवारी रोजी आ.शेखर निकम यांच्याहस्ते करण्यात येणार आहे.

चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदार संघात गेल्या अडीच वर्षात आ. निकम यांच्या माध्यमातून अनेक वर्षापासूनची दुर्लक्षित विकासकामे मार्गी लागत आहेत. मोठे पुल, पाणी योजना, रस्ते यांच्यासह ग्रामीण आणि शहरी भागाच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक पायाभूत सोयीसुविधा देण्याच्या दृष्टीने आ. निकम यांनी लक्ष केंद्रीत केले आहे.

विविध योजनांच्या माध्यमातून अधिकाअधिक निधी मतदार संघात कसा आणता येईल त्यादृष्टीने यादृष्टीने ते लक्ष केंद्रीत करीत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील आमदारांमध्ये सर्वाधिक निधी आणण्यात ते यशस्वी ठरले आहेत. यातूनच आता दुर्लक्षित राहिलेल्या खाडीपट्ट्यातील विकासासाठी त्यांनी पावले उचलली आहेत.

खाडीपट्ट्यातील सुमारे तीस कि.मी. लांबीच्या कोंढे-करंबवणे मार्गावर महिनाभरापुर्वीच सव्वा कोटीहून अधिक निधी खर्चाच्या, रस्त्याचे डांबरीकरण झाल्यानंतर आता कोंढे-शिरळ पुलाच्या पुनर्बांधणीसाठी १ कोटी १० लाखाचा निधी मंजूर केला आहे. त्याचबरोबर याच मार्गावर बॉक्ससेलसाठी ३३ लाख, तर रस्ता मजबुती व डांबरीकरणासाठी ६६ लाख ६२ हजार अर्थसंकल्पातून मंजूर केले आहेत.

या सर्व कामांचे भूमिपूजन कार्यक्रम रविवारी आयोजित करण्यात आला आहे.

अनेक वर्षे कोंढे पुलाच्या दुरुस्तीबाबत मागणी होत होती. मात्र, दुर्लक्ष केले जात होते. या मार्गावर कोंढे, शिरळ, खोपड, कालुस्ते, भिले, केतकी, करंबवणेसह अनेक गावे येतात. त्याचबरोबर धामेली, बिवली, मालदोली, ग्रांगई, कापरे या भागाकडे जाण्यासाठीही हा मार्ग सोयीचा ठरतो. त्यामुळे हा मार्ग सुस्थितीत करण्यासाठी आ. निकम यांनी प्रयत्न केल्याने ग्रामस्थांतून समाधान व्यक्त होत आहे.

> **गावागावात विकासकामे शासनाच्या विविध योजनांतून होतच असतात. मात्र प्रमुख रस्ते, जीर्ण पुलांचे प्रश्न मार्गी लागणे महत्त्वाचे आहे. मतदारसंघात आपण त्यादृष्टीने प्रयत्न करीत आहोत. अर्थसंकल्पातून कोट्यवधीचा निधी विविध कामांसाठी मंजूर झाला आहे.**
> **– आ.शेखर निकम, चिपळूण**

# चिपळूणमध्ये बिबट्याकडून वासराची शिकार

। चिपळूण । प्रतिनिधी ।

तालुक्यातील अलोरे शीरगाव सीमेवर गुरांच्या गोठ्यात घुसून, एका बिबट्यानेवासराचीशिकारकेलीआहे. याप्रकरणी वनविभागाने घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे. पंचनाम्याअंती संबंधित शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी माहिती वनविभाग कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

चिपळूण तालुक्यातील अलोरे पोफळी शिरगाव या परिसरात बिबट्याचा वावर हा नेहमीचाच विषय राहिला आहे.

घनदाट जंगल असल्याने बिबट्याचा वावर येथे असतो. परंतु बिबटे आता मानवी वस्तीकडे चाल करू लागले असल्याचे अनेक उदाहरणे समोर येऊ लागली आहेत.

दोन महिन्यापूर्वीच तालुक्यातील पिळवली येथे बिबट्याने पती पत्नीवर हल्ला करून जखमी केले होते.

त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये देखील भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# खेडमध्ये करिअर गाईडन्स कार्यक्रम

। चिपळूण । प्रतिनिधी ।

खेड तालुक्यातील श्रीसमर्थ कृपा विश्व प्रतिष्ठान संचलित श्रीसमर्थ कृपा इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनियर कॉलेज, वेरळ येथे घरडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी लवेल यांच्यामार्फत मोफत करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यानिमित्त प्रमुख मार्गदर्शक डॉ. रोहन कळमकर व प्रतीक ओक यांनी शासकीय शिष्यवृत्ती आणि योजना, विशेष शिष्यवृत्ती, अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती, एथड तपशील, मेरिट नंबरची समज, समुपदेशन आणि कट ऑफ तपशील आवश्यक कागदपत्रांचे महत्व याचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाप्रसंगी संस्थाध्यक्ष सुयश पाष्टे, स्वाती कान्हेकर, प्रशालेचे प्राचार्य डॉ. एस. एस. अली, शैक्षणिक समन्वयक अजित भोसले तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल भोसले व आभार प्रदर्शन अम्मार चिपळूणकर यांनी केले.

# चिपळूणमध्ये आशा सेविकांचा सत्कार

। चिपळूण । प्रतिनिधी ।

हेल्प फाऊंडेशन चिपळूण तसेच उमा फॅशन इन्स्टिट्युट यांच्यातर्फे खेर्डी गटातील आशा सेविकांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी खेर्डीच्या सरपंच वृंदा दाते, आशा सेविका गटप्रवर्तक श्रद्धा जाधव, उमा इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षा उमा म्हाडदळकर, हेल्प फोंडेशन उपाध्यक्षा अंजली कदम आदी उपस्थित होत्या.




कोरोना काळात आशासेविकांनी तळागाळात फार मोठे काम केले आहे व त्यामुळेच या काळामध्ये अनेक रुग्ण बरे झालेले आहेत. मात्र दुर्दैवाने आशा सेविकांच्या या कामाची दखल पाहिजे तेवढी घेतली गेली नाही हेही तेवढेच खरे आहे. परंतु हेल्प फाऊंडेशन हे आशा सेविकांच्या प्रश्नासाठी व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्याबरोबर सातत्याने राहील, अशी ग्वाही हेल्प फाऊंडेशन चिपळूणचे अध्यक्ष सतीश कदम यांनी खेर्डी ग्रामपंचायंत येथे पार पडलेल्या आशा सेविकांच्या सत्कार कार्यक्रमात दिली.

उमा फॅशन इन्स्टिट्यूट गेली १५ वर्षे महिलांना टेलरिंग व्यवसाय ट्रेनिंग देते, नुकताच जिल्हा उद्योग केंद्र पुरस्कृत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र आयोजित फॅशन डिझायनिंग कोर्समध्ये काही आशा सेविका यांनी प्रवेश घेतला, त्यावेळी चर्चेत आशा सेविका सामाजिक बांधिलकी कशी जपतात तसेच त्यांचे काम किती महत्वाचे आहे हे दिसून आले. आणि त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा असे या संस्थाकडून ठरविण्यात आले होते.

## देश-विदेश

# जनताच देशाला भाजपमुक्त करेल

**नाना पटोले यांचे प्रतिपादन**
**भाजपवर साधले टीकास्त्र**

। मुंबई । वृत्तसंस्था ।

कोरोना महाराष्ट्राने पसरवला, असे सांगत लोकसभेत महाराष्ट्राला पंतप्रधानांनी बदनाम केले. महाराष्ट्राची बदनामी कॉंग्रेस कधीही सहन करणार नाही. कॉंग्रेसवर टीका करून हे सत्तेत आलेत. आजही तेच करत आहे. हे कॉंग्रेसमुक्त करू इच्छितात. मात्र, जनताच देशाला भाजपमुक्त करेल आणि हे कधी झाले, हे यांना कळणार नाही, असे प्रतिपादन कॉंग्रेस महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे.



नुकताच कॉंग्रेसमध्ये मेगा भरती झाली. भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनेतून अनेक कार्यकर्त्यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश घेतला. यावेळी नाना पटोले यांनी भाजपवर सडकून टीका केली. तसेच मालेगावमध्ये कॉंग्रेसमधून राष्ट्रवादीत गेलेल्या कार्यकर्त्यांबाबत देखील पटोलेंनी प्रतिक्रिया दिली.

नाना पटोले म्हणाले की, ही तर झाकी आहे. राज्यात महाविकास आघाडी पक्षाचे सरकार आहे. पण, पक्ष वाढविण्याचा अधिकार प्रत्येकालच आहे. मालेगाव, भिवंडीमध्ये जे झाले त्याचा राग आहे. पण द्वेष नाही. आम्ही कोणाला प्रलोभन देत नाही. कोणाशी स्पर्धा करत नाही.

तसेच महाविकास आघाडीतील सर्व पक्षांनी समन्वयाने वागावे. समन्वयाने चालावे ही भूमिका होती, मात्र एखाद्या मोठ्याने मोठ्या पद्धतीने राहिले तर सन्मान होतो. मोठाच जर थोडस चुकीचे करत असेल तर लहानही चुका करायला मोकळा असतो, हा संदेश या निमित्ताने आम्ही दिला आहे, असे नाना पटोले म्हणाले.

> **भाजपला सत्तेचा रोग**
> *भाजपला सत्तेचा मानसिक रोग झाला आहे. पहाटेच सरकार गेले तेव्हापासून भाजपचे मानसिक संतुलन बिघडले आहे. बेताल वक्तव्य करून राज्याच्या जनतेची दिशाभूल करत आहे. हे नेते आरएसएसमध्ये मोठे झाले आणि पदवार बसले. आरएसएसची ही संस्कृती आहे का? हिंदुस्थानची ही संस्कृती आहे का? असे सवाल उपस्थित करत नाना पटोलेंनी भाजपवर हल्लाबोल चढवला.*

# वाईनविक्री विरोधातील अण्णांचे उपोषण मागे

। अहमदनगर । वृत्तसंस्था ।

अण्णा हजारे यांनी नुकताच वाईनविक्रीविरोधातील स्वतःची भूमिका स्पष्ट केली होती. उद्यापासून उपोषण करणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. पण, ग्रामसभेत ठराव पास झाला असून अण्णांनी त्यांचे उपोषण तीन महिन्यांसाठी पुढे ढकललं आहे. याबाबत राळेगणसिद्धीचे माजी सरपंच डॉ. धनंजय पोटे यांनी माहिती दिली आहे.



ज्येष्ठ समाज सेवक अण्णा हजारे यांचे उद्या होणारे उपोषण मागे घेण्यात आले आहे. अण्णा हजारेंनी आंदोलन करू नये, असा निर्णय ग्राममसभेत एकमुखाने घेण्यात आला आहे. सरकारने सुपर मार्केटमध्ये वाईन विक्री करावी की नाही? आणि अण्णा हजारे यांनी उपोषणाला बसावं की नाही याबाबत ठराव मांडण्यासाठी ग्रामसभा झाली.

या ठरावात सरकारने याबाबत घेतलेल्या निर्णयाचा पुनर्विचार करावा आणि अण्णा हजारे यांनी उपोषण करू नये; असा ठराव मंजूर करण्यात आला आहे. अण्णांची तब्येत पाहता त्यांना उपोषण करू नये, असे पत्र लिहिण्यात आले. त्यानंतर अण्णांनी पुढील ३ महिन्यांसाठी उपोषण स्थगित केले.

महाराष्ट्रात सुपर मार्केटमध्ये वाईन विक्री केली जाते, ही महाराष्ट्राची संस्कृती आहे का? असा सवाल अण्णा हजारेंनी सरकारला केला होता. तसेच मला तुमच्या राज्यात जगायची इच्छा नाही. राज्य सरकारच्या अशा निर्णयामुळे मला जगायची इच्छा नाही. असे अण्णा हजारे म्हणाले होते.

# ब्रिटनमध्ये महिलेवर वर्णद्वेषी हल्ला

> **पाश्चिमात्य जगतात आजही विखार कायम**

। लंडन । वृत्तसंस्था ।

ब्रिटनमध्ये वर्णद्वेषातून एका पुरुषानं महिलेवर हल्ला चढवला, त्यानं या महिलेच्या डोक्यावरील केस इतक्या जोरात ओढले की, डोक्यावरील त्वचा फाटल्यानं ती गंभीर जखमी झाली आहे.

जगभरात वर्णद्वेषाची वृत्ती अद्यापही लोकांच्या मनातून हद्दपार झालेली नाही. पाश्चात्य देशांमध्ये अद्यापही वर्णद्वेषातून हल्ल्यांच्या घटना वारंवार समोर येत आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, ३१ वर्षीय महिलेवर हा प्रसंग ओढवला आहे. यामध्ये पोलिसांनी हल्लेखोर पुरुषांचा एक फोटो प्रसिद्ध केला आहे. जेव्हा या महिलेवर हल्ला झाला तेव्हा ती ११९ या क्रमांकाच्या बसमधून रेल्वेस्टेशनवर उतरली होती.

हल्लेखोर तरुणांने महिलेचे केस इतक्या जोरात ओढले की तिची टाळू फाटून केस हातात आले. त्यानंतर हल्लेखोराने महिलेच्या डोक्यात मागून जोरदार प्रहार करुन तिला खाली पाडले.

याप्रकरणी प्रतिक्रिया देताना डिटेक्टिव्ह कॉन्स्टेबल बेकी ह्युग्ज म्हणाले, हिंसक गुन्हे विशेषतः महिला आणि मुलींविरोधातील गुन्ह्यांना हाताळणं ही आमची प्राथमिकता आहे. पोलिसांनी प्रसिद्ध केलेल्या हल्लेखोराचा फोटो पाहून त्याची जर कोणाला माहिती असेल तर संबंधितांनी ब्रिटन पोलिसांशी संपर्क साधावा असं आवाहनही करण्यात आले आहे.

# भाजपला भोवला सोमय्यांचा सत्कार

। पुणे । वृत्तसंस्था ।

भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पुणे दौऱ्यात अनेक घडामोडी घडल्या होत्या. आधी त्यांना शिवसैनिकांकडून धक्काबुक्की झाली. त्यानतंर त्याच ठिकाणी भाजपकडून सोमय्यांचा सत्कार करण्यात आला होता. आता हे सत्कार प्रकरण भाजप नेत्यांना भोवले आहे. पुणे महापालिकेत किरीट सोमय्या यांचा भाजपने केलेल्या सत्कार प्रकरणात शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बंदी आदेश उल्लंघन,घोषणाबाजी आणि बेकायदेशीर जमाव जमवून त्या ठिकाणी गोधळ झाला या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

यामध्ये भाजप शहराध्यक्ष जगदीश मुळीक, बापू मानकर, राजेश येनपुरे, दीपक पोटे, धनंजय जाधव, दत्ता खाडे, गणेश घोष, प्रतीक देसरडा यांच्यासह ३०० कार्यकर्ते यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# बहुजनांची बाजू घेतली की गुन्हेगार-आव्हाड

## जितेंद्र आव्हाडांची पोस्ट चर्चेत

। मुंबई । वृत्तसंस्था ।

राज्याचे गृहविकास मंत्री जितेंद्र आव्हाड यांचे एक ट्विट सध्या चर्चेत आले आहे. या ट्विटमध्ये त्यांनी एका बिल्डरची नोकरीविषयक जाहिरात शेअर केली असून, यातील एका निकषावर त्यांनी आक्षेप घेतला आहे. ही पोस्ट करताना हा जातीभेद नाही का? आणि आम्ही बहुजन समाजाची बाजू घेतली की गुन्हेगार, असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.



आव्हाड यांनी शेअर केलेली जाहिरात 'आराधना बिल्डर्स अँड डेव्हलपर्स' या ठाणे येथील बांधकाम कंपनीची आहे. या जाहिरातीमध्ये महिलांसाठी असलेल्या 'सेल्स आणि मार्केटिंग' या पदासाठी अर्ज करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

या पदासाठी सहा निकष निश्चित करण्यात आले आहेत. यांपैकी एका निकषामध्ये ब्राह्मण समाजाच्या उमेदवाराला प्राधान्य देण्यात येईल असं म्हटलं आहे. नेमक्या याच मुद्द्यावर आव्हाड यांनी आक्षेप घेतला आहे.

आव्हाडांनी ट्विटरवर शेअर केलेल्या या पोस्टला अनेकांनी प्रतिसाद दिला असून अनेक कमेंटही आल्या आहेत. अनेकांनी ही पोस्ट रिट्विटही केली आहे.

# 'मुंबईत हेल्थ अलर्ट जारी करा'

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मुंबईतील हवेचा दर्जा धोकादायक पातळीवर पोहोचला असून त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, मुले, गरोदर स्त्रियांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून महापालिकेने मुंबईत 'हेल्थ अलर्ट' जारी करण्याची विनंती आवाज फाऊंडेशनने मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केली आहे.

गेल्या दोन आठवड्यांमध्ये मुंबईत २०१५ नंतरचे सर्वाधिक वायुप्रदूषण नोंदवले गेले. मुंबईतील हवा गुणवत्ता निर्देशांक जानेवारी तसेच फेब्रुवारी महिन्यात ५०० वर गेल्याने तीव्र प्रदूषणाची नोंद झाली. आखाती प्रदेशातून आलेल्या धुळीच्या वादळांमुळे महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थानमध्ये प्रदूषण वाढल्याचे सांगण्यात आले.

मात्र मुंबईतील वाढत्या वायुप्रदूषणाला धुळीचे वादळ हे एकमेव कारण नसून वाहनांची वाढती संख्या, एमआयडीसीतून सोडले जाणारे विषारी वायू, बांधकामादरम्यान उडणाऱ्या धुळीमुळेही प्रदूषण वाढल्याचे आवाज फाऊंडेशनने म्हटले आहे. हवेची खराब गुणवत्ता आणि त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम केवळ हिवाळ्यातच नव्हे, तर संपूर्ण वर्षभर होत आहे. हीच मुंबईकरांसाठी चिंतेची बाब असल्याचेही आवाज फाऊंडेशनने म्हटले आहे.

वायुप्रदूषणामुळे केवळ श्वसनासंबंधी नव्हे, तर मेंदुविकारदेखील होत असल्याचे अनेक वैद्यकीय अभ्यासांमध्ये स्पष्ट झाले आहे. पीएम २.५ उत्सर्जन अधिक असलेल्या ठिकाणी कोविड संसर्ग अधिक होण्याची शक्यता अधिक असल्याचे पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या संशोधनातून समोर आले आहे. त्यामुळे राष्ट्रीय सरासरी आयुर्मान चार, मुंबईतील सरासरी आयुर्मान ३.७ वर्षांनी कमी झाल्याचे आवाज फाऊंडेशनच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# चेंबूरजवळ कारचा भीषण अपघात



**मुंबई :** येथील कुर्ला आणि चेंबूर दरम्यान पूर्व द्रूतगती मार्गावर चारचाकीची डंपरला धडक बसल्याने भीषण अपघात झाला आहे. यामध्ये ४ जण जखमी झाले असून, एकाची प्रकृती चिंताजनक आहे. जखमींना जवळील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

संबंधित दुर्घटनेची माहिती मिळताच नेहरू नगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दुर्घटनेत डंपर उलटला असून, चारचाकीचा चेंदामेंदा झाला आहे.

या अपघातानंतर डंपरचा चालक घटनास्थळावरून फरार झाला असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

# नगरपरिषदेची 'ग्रीन कर्जत'कडे वाटचाल

## सोलर पॅनलमधून होतोय वीजपुरवठा

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत नगरपरिषदेने आपल्या शहरातील तापमानात वाढ होऊ नये आणि शहरातील पर्यावरण राखले जावे यासाठी 'ग्रीन कर्जत'चा नारा दिला आहे. त्यासाठी आधी स्वतःपासूनच सुरुवात केली आहे. शहरात आता विजेची बचत करणारे एलईडी दिवे बसविण्यास सुरुवात केली आहे. तर, शहरातील चौक येथील विजेचे दिवे सोलरवर प्रकाशमान करण्यास सुरुवात केली आहे. कर्जत नगरपरिषदेने आपल्या कार्यालयातील वीज सोलर पॅनलचा प्रयोग करून वापरात आणली आहे.

शहरात जलसंवर्धनासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून, शहरातील जुन्या आणि पुरातन विहिरींचे नूतनीकरण आणि सुशोभिकरण केले जाणार आहे. विहिरींची स्वच्छता करतानाच खोलीकरण आणि रंगरंगोटी तसेच माहितीपत्रक त्या ठिकाणी लावली जाणार आहेत. हे नूतनीकरण मार्च महिन्यात पूर्ण केले जाणार असून, सध्या त्या विहिरींमध्ये असलेल्या पाण्याचा वापर झाल्यावर ती कामे पूर्ण केली जाणार आहेत. रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी पालिकेने तयारी केली आहे. शहरातील गार्डनमध्ये पालिका असा प्रयोग करणार असून, नंतर तो खासगी बांधकाम व्यावसायिक




यांच्यासाठी लागू करण्याचा प्रयत्न राहणार आहे. त्यासाठी जलसंवर्धन कार्यशाळा पालिकेने आयोजित केली होती.

## विजेच्या बचतीसाठी एलईडी दिवे

> या प्रकल्पामुळे कर्जत शहर ग्रीन कर्जत आणि पर्यावरणस्नेही कर्जत बनविण्यासाठी वाटचाल सुरु आहे. नागरिकांना पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जागरुक राहण्याचे आवाहन आम्ही करीत असून, नागरिकदेखील तितकाच प्रतिसाद देत आहेत.
> – डॉ. पंकज पाटील, मुख्याधिकारी

कर्जत नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष सुवर्णा जोशी आणि मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्या संकल्पनेतून कर्जत नगरपरिषद कार्यालय आता वीज संपन्न झाले आहे. पालिकेच्या कार्यालयाच्या टेरेसवर पालिकेने ३० किलो वॅट वीजनिर्मिती करणारे सोलर पॅनल बसविले आहेत. त्यातून संपूर्ण कार्यालयाची वीज बचत होऊ लागली आहे. तर, शहरातील विजेचे पथदिवे हे अपारंपरिक ऊर्जाच्या माध्यमातून आणि ग्रीन कर्जतच्या हेतूने एलईडी पध्दतीचे लावले गेले आहेत. शहरात आतापर्यंत ५००० एलईडी दिवे लागले असून, ५० ठिकाणी सोलर पॅनल चौका चौकात बसविले आहेत. त्यातून शहराचे रात्रीच्या प्रकाशात रुपडे पालटण्यास मदत झाली आहे. आगामी काळात शहरातील सर्व ठिकाणी असलेल्या पथदिव्यांवर एलईडी दिवे लावण्यात येणार आहेत.

### वसुंधरेच्या संरक्षणासाठी शपथ

शहरात माझी वसुंधरा मित्र बनवले असून, शहरात आजच्या घडीला ५००० हून अधिकांनी वसुंधरेचे रक्षण करण्याची शपथ घेतली आहे. हे तरुण कर्जत शहरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नागरिकांना जागरूक करण्याचे काम करीत आहेत. त्याचवेळी झाडे लावण्याचे आणि कचरा कुठेही टाकू नये, त्यांचे वर्गीकरण करुन त्यांचे कचरा गाडीत संकलन करण्यासाठी पुढाकार घेत आहेत.



■ वसुंधरेच्या रक्षणाची शपथ घेताना. (छायाचित्र : संतोष पेरणे)

## नेरळ रेल्वे स्थानकातील लिफ्टचे काम पूर्ण

**। नेरळ । वार्ताहर ।**

मध्य रेल्वेच्या मुंबई-पुणे या मार्गावरील नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी लिफ्टची सोय करावी, अशी मागणी होत होती. त्यानंतर मावळ लोकसभा मतदारसंघाचे खा. श्रीरंग बारणे यांनी नेरळ रेल्वे स्थानकात लिफ्टची व्यवस्था करण्याची मागणी पूर्ण केली आहे.

नेरळ रेल्वे स्थानकातील लिफ्टचे काम पूर्ण झाले असून, आता ती सुविधा कधी कार्यान्वित होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. तर, नेरळ स्थानकात सरकते जिने कधी अस्तित्वात



येणार, ही मागणी प्रवाशांनी केली असून, त्याची पूर्तता करावी, अशी मागणी होत आहे. नेरळ रेल्वे स्थानकात नवीन पादचारी पुलाची निर्मिती झाल्यांनतर त्याची उंची पाहून सर्वांची दमछाक होत होती. तब्बल ४७ पायऱ्या एका बाजूला असलेल्या त्या पादचारी पुलाबाबत सतत तक्रारी येत होत्या.

नेरळ प्रवासी संघटनेने नेरळ स्थानकात प्रवाशांसाठी निवारा शेड, फलाट एक वर स्वच्छता गृह तसेच कर्जत एन्डकडे पादचारी पूल आणि फलाट एकवरील तिकीट खिडकी दिवसभर सुरू ठेवण्याची मागणी केली जात आहे. मात्र, प्रवाशांची पादचारी पूल करताना सुरू असलेली दमछाक कमी करण्यासाठी काम पूर्ण केलेल्या लिफ्टबद्दल रेल्वे प्रवासी संघटनेने रेल्वे बोर्ड आणि खासदारांचे आभार मानले आहेत.

## 'स्वच्छ सर्वेक्षण'साठी नगरपरिषद लागली कामाला

### गाव परिसरातील, शाळांच्या भिंती झाल्या बोलक्या

**। माथेरान । वार्ताहर ।**

स्वच्छ, सुंदर आणि हरित माथेरान ही व्याख्या खऱ्या अर्थाने माथेरानमध्ये अंमलात आणण्यासाठी सुरुवातीला नागरिकांची स्वच्छतेच्या बाबतीत मानसिकता असणे आवश्यक आहे. प्रशासन हे आपल्या परीने नागरिकांच्या सर्व बाबतीत उद्भवणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी तत्पर असते. मग त्या स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून असोत की अन्य मूलभूत नागरी सोयीसुविधा असोत नेहमीच प्रशासन जनसेवेसाठी पुढाकार घेत आहे.

सध्या इथे प्रशासक राजवट असून, माथेरान नगरीला मुख्याधिकारी तसेच एक उत्तम प्रशासक म्हणून सुरेखा भणगे-शिंदे लाभल्या आहेत. त्यांनी स्वतःच्या मनाशी जिद्द ठेवली आहे. इथली अस्वच्छता दूर करण्यासाठी त्यांनी खरोखरच पुढाकार घेतला असून, स्वतः विविध प्रभागात भेटी देत आहेत. स्वच्छता सर्व्हेक्षण २०२२




साठी यावेळी निश्चितच माथेरान शहराला शासनाकडून पुरस्कार प्राप्त होणार ही त्यांना खात्री आहे, त्या दृष्टीने त्यांनी स्वतःला या कामात वाहून घेतले आहे.

गावातील मोकळ्या जागेत असणाऱ्या त्याचप्रमाणे शाळेतील भिंतीवर सुबक चित्रे रेखाटण्यात येत आहेत. एकूणच, सर्व भिंती बोलक्या केल्या जात आहेत. रस्ते नेहमीपेक्षाही अधिक चकाचक आणि स्वच्छ केले जात आहेत.

## नगराध्यक्षांसोबत आ. गोगावले यांनी घेतली नगरविकासमंत्र्यांची भेट



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

महाडचे आमदार भरत गोगावले यांनी माणगाव आणि पोलादपूर तसेच खालापूर नगरपंचायतीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष तसेच उपनगराध्यक्ष यांच्यासह राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली.

याप्रसंगी आ. गोगावले यांच्यासोबत कर्जतचे आ. महेंद्र थोरवे, पोलादपूर तालुका प्रमुख निलेश अहिरे, रायगड जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे तसेच पोलादपूर नगराध्यक्षा सोनल गायकवाड आणि नगरपंचायतीमधील इतर नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी माणगाव, पोलादपूर आणि खालापूर नगरपंचायतीचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष यांना पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ग्रामस्थांकडून तिघांना जीवदान

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

शिलोशी येथे शुक्रवारी सायंकाळी घराची भिंत पडली. त्या भिंतीखाली गावातील महिला भावना भोईर (४०), पुरुष अशोक गोळे (६०) तसेच एक २० वर्षीय तरुण मुलगा अडकला होता. शिलोशी ग्रामस्थांनी जीवाची बाजी लावून त्यांचे प्राण वाचवले. ग्रामस्थांनी प्रसंगावधान दाखवत ढिगाऱ्याखालील जखमींना पाली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे दाखल केले. वैद्यकीय अधिकारी यांनी तपासणी करून जखमी झालेल्या तिघांवर प्रथमोपचार केले. त्यामधील दोघांची प्रकृती स्थिर असून, त्यांना घरी सोडले, तर या दुघटनेतील २० वर्षीय तरुणाच्या पायाला मार लागला असल्यामुळे अधिक उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

## दिघी नाक्यास अंतुलेंचे नाव द्या

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा नगर पंचायतीचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष असहल कादिरी यांचे तालुका काँग्रेसच्या वतीने अध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. मुईज शेख यांनी काँग्रेसच्या शिष्टमंडळासोबत अभिनंदन करून म्हसळा शहराची ओळख असलेल्या दिघी नाक्यास बॅ.ए.आर. अंतुले यांचे नाव देण्यात, यावे अशी लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे.

निवेदनात त्यांनी कोकणचे भाग्य विधाते माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय बॅ.ए.आर. अंतुले यांचे सामाजिक आणि राजकीय नेतृत्व तसेच त्यांच्या कार्याचे योगदान लक्षात घेता



### काँग्रेसची मागणी

बॅ. अंतुले यांनी म्हसळा तालुक्यात केलेल्या कामांचे जडणघडणीचा गौरव कायम स्मरणात राहण्यासाठी म्हसळा शहराची प्रामुख्याने ओळख असलेल्या दिघी नाक्याला बॅ.ए.आर. अंतुले यांचे नाव देण्याची मागणी केली आहे. नगर पंचायतीच्या कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी दिपल मुंडे यांच्याकडे निवेदन सादर करताना काँग्रेसचे तालुका अध्यक्ष डॉ. मुईज शेख यांच्यासमवेत नगरसेवक सुफीयान हलदे, काँग्रेसचे ता. पर्यावरण अध्यक्ष बाबाजान पठाण, महिला शहर अध्यक्षा नाजीमा मुकादम, शहर युवक काँग्रेसचे सुभेदार उपस्थित होते.

## विजय मेथा यांना मातृशोक

**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगाव तालुका पत्रकार संघाचे ज्येष्ठ सल्लागार व मार्गदर्शक तथा प्रतिष्ठित व्यापारी विजय मेथा व माणगाव अशोकदादा साबळे विद्यालयाचे स्कूल कमिटी चेअरमन राजन मेथा यांच्या मातोश्री मालती चुनीलाल मेथा यांचे



शनिवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी पुणे इस्पितळात वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, एक मुलगी, जावई, सुना, बारा नातवंडे असा परिवार आहे. कै. मालती मेथा यांचा उत्तरकार्य विधी गुरुवार, दि.२४ फेब्रुवारी रोजी राहते घरी माणगाव येथे होणार असल्याचे त्यांचे सुपुत्र विजय मेथा यांनी सांगितले.

## महत्त्वाचे

### महिलेचा विनयभंग; तरुणावर गुन्हा

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्यातील आंगरआळी भागातील महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी नागोठण्यातील हुजरा मोहल्ला भागातील तरुण जुबेर अश्रफ पानसरे (३२) या तरुणावर नागोठणे पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. नागोठणे हुजरा मोहल्ला येथील आरोपी जुबेर अश्रफ पानसरे याने कोरोना महामारीच्या काळातील पहिला लॉकडाऊन चालू असताना मार्च २०२० मध्ये दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास महिला फिर्यादी, रा. अंगारआळी नागोठणे, ता. रोहा यांचे घरी जाऊन त्यांचा विनयभंग केला. तसेच आरोपीने फिर्यादींचा वारंवार पाठलाग करून फोटो व व्हिडिओ सर्वांना दाखवून बदनामी करण्याची धमकी दिली होती.

### सुनिर्मल पुरस्कार; माहिती पाठवा

**अलिबाग :** सुनिर्मल फाऊंडेशन मुंबईच्या वतीने दरवर्षी समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते गौरव केला जातो. यात डॉक्टर, शिक्षक, साहित्यिक, पत्रकार, वकील, कवी, वृत्तपत्र लेखक, सामाजिक संस्था आणि संघटनांचा समावेश आहे. या पुरस्कारासाठी आपण केलेल्या कार्याची माहिती १५ मार्चपर्यंत शैलेश खंदारे (अध्यक्ष) ए /१२, तुलसी भवन, तळमजला, स्वामी वल्लभदास मार्ग, साधना हायस्कूलच्या शेजारी, सायन (वेस्ट), मुंबई ४०००२२ येथे प्रत्यक्ष आणून द्यावे किंवा पोस्टाने पाठवून द्यावे. अधिक माहितीसाठी उपाध्यक्ष दत्ता खंदारे यांच्याशी ९६९९३१३६२१ संपर्क साधावा.

### काँग्रेसच्या तालुका अध्यक्षपदी पारंगे

**रसायनी :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या आदेशानुसार तसेच रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या सूचनेनुसार रायगड जिल्ह्यातील खालापूर, उरण, पनवेल अशा तीन तालुका अध्यक्षांची निवड प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत व जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली प्रदेश कार्यालयात करण्यात आली. यावेळी खालापूर, पनवेल, उरण तालुका अध्यक्षांची निवड करण्यात आली यामध्ये खालापूर तालुका अध्यक्षपदी वासांबे मोहोपाडाचे माजी सरपंच कृष्णा पारंगे यांची निवड करण्यात आली आहे.

### माणगावातील गोळीबार प्रकरण

## फरार आरोपींची मोटारसायकल सापडली

**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगाव शहरातील कचेरी रोड मार्गावर शनिवारी रात्रीच्या सुमारास आपले औषधाचे दुकान बंद करून आपल्या मोटारसायकलवरून शुभम जैस्वाल (२४) आपला सहकारी दीपक यादव (२४) रा. माणगाव याच्यासमवेत कचेरी रोड मार्गाने घरी जात असताना, त्यांना पल्सर मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात मारेकरी आरोपींना थांबवून त्यांच्यावर गोळीबार



केला. यानंतर आरोपी मुंबई-गोवा महामार्गावरून इंदापूर बाजूकडे पळून गेले होते. या अज्ञात मारेकरी आरोपींची पल्सर मोटारसायकल (क्र. एम.एच.४३-ए.एस.६६७४) माणगावजवळील एक कि.मी. अंतरावर असणाऱ्या कलमजे पुलाजवळ रस्त्याच्या कडेला सापडल्याची माहिती माणगाव पोलिसांनी दिली.

## मर्यादित बसमुळे प्रवाशांचे हाल

### गाडीत चढण्यासाठी मोठी झुंबड

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

सध्या ठराविक मार्गावर तीन तासाच्या अंतराने गाड्या सोडल्या जातात. यामुळे एसटी स्टँडमध्ये प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. तीन तासांनी एसटी आली की एसटीमध्ये जाण्यासाठी प्रवाशांची खेचाखेची सुरु होते. त्यामध्ये लहान मुलांना घेऊन चढणाऱ्या व्यक्तींचे मोठे हाल होतात. ज्येष्ठ नागरिकांना एवढ्या मोठ्या गर्दीत गाडीत प्रवेश करणे शक्य होत नाही.



एक गाडी गेली की तीन तासांनी दुसरी गाडी येईपर्यंत प्रवाशांना वाट पाहावी लागत आहे. एकतर, काही एसटीच्या गाड्या मधले प्रवासी घेत नाहीत. त्यामुळे प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागत आहे. विद्यार्थी तर जीव मुठीत घेऊन रिक्षाने किंवा इतर वाहनाने प्रवास करत आहेत.

## 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश प्रकोष्ठकडून करण्यात आले असून, प्रदेश संयोजक डॉ. शुभा पाध्ये यांच्या नेतृत्वाखाली सदर स्पर्धेची घोषणा झाली आहे. या स्पर्धेचा उद्देश युवा वर्गात 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानाविषयी जागृती निर्माण करणे हा आहे. या स्पर्धेतून अनेक उत्तम वक्तृत्व असणाऱ्या व समाजापुढील प्रश्नांवर विचारमंथन करण्यास इच्छुक असणाऱ्या युवक-युवतींना आपले विचार निर्भीडपणे मांडण्यासाठी खुले व्यासपीठ उपलब्ध केलेले आहे.

स्पर्धेसाठी भाषा माध्यम मराठी, हिंदी, इंग्रजीपैकी एक निवडायचे असून, स्पर्धा कालावधी २० फेब्रुवारीपर्यंत आहे. यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंग ३ ते ५ मिनिटांचे असावे, तर व्हिडिओ साईज ५० ते ६० मेगाबाईटस्पेक्षा जास्त नसावी. प्रथम पारितोषिक रू.२१ हजार, द्वितीय पारितोषिक रू.११ हजार, तृतीय पारितोषिक रू.७ हजार तसेच उत्तेजनार्थ पारितोषिकेही दिली जाणार आहेत. स्पर्धेचे विषय १) आजची पिढी, तंत्रस्नेही पिढी. २) विचार मंथन-लग्नाचे वय २१. ३) सृजनकर्ती मी, तरी अजूनही असुरक्षित मी. ४) भारतीय स्त्री, आत्मनिर्भर स्त्री. ५) मुलगी देशाची शान, प्रत्येक घराचा सम्मान असे असून, १६ ते २५ वर्षे वयोगटातील मुले-मुलींसाठी असलेली ही खुली स्पर्धा आहे. अधिक माहितीसाठी निलिमा राजय भोसले-९१३००१६९६७ आणि अतुल प्रजापती-९८३३२९६६२२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

■ श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

■ अलिबागमध्ये कॉफी शॉपमध्ये कामासाठी मुलगा पहिजे- संपर्क- ८६९८५०३८८८

■ वरसोली बिच रोड येथे 1BHK फुल फर्निश ब्लॉक विकणे आहे. नंबर- ८८०५५४०४६४

■ अलिबागमधील ऑफिसकरिता आर्किटेक्ट, इंटिरियर डिझायनर आणि ड्राफ्ट्समन पाहिजे. मोबाईल नंबर- ८००७४५२१४६

■ अलिबाग एस.टी. स्टॅण्डजवळ दुकान गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क -९७६४५४८६७९

**जाहिरातीसाठी संपर्क**

☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# कार्लें येथील पांढरा कांदा बाजारात



## हवामान बदलाने उत्पादनात ५० टक्के घट

**। खारेपाट । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील प्रगतशील शेतकरी सतीश म्हात्रे व रंजन म्हात्रे व म्हात्रेबंधू गेली अनेक वर्षे पांढऱ्या कांद्याचे उत्पादन घेत आहेत. त्यांच्या शेतातील कांद्याला रायगड जिल्ह्यास संपूर्ण राज्यभरात मोठी मागणी असून, विक्रीसाठी दाखल झाला आहे.

सन २०२१ च्या तुलनेने २०२२ या वर्षात अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण, उष्ण, दमट, थंड अशा वातावरणामुळे पांढऱ्या कांद्याच्या लागवडीमध्ये करपा रोग तसेच किडीचा रोग अशा विविध समस्येने यावर्षी शेतकऱ्यांच्या ५० टक्के उत्पादनात घट झाली आहे.

विशेष म्हणजे, सतीश म्हात्रे



■ कार्ले येथील पांढरा कांदा उत्पादक सतीश म्हात्रे यांच्या निवासस्थानी कांद्याच्या माळा विणताना महिला. (छायाचित्र : महेंद्र म्हात्रे)

यांनी निसर्गाच्या अनेक समस्यांवर मात करुन कठोर परिश्रम व सातत्याने मेहनत घेऊन शासनाच्या कृषी अधीक्षक रायगड जिल्हा व सर्व कृषी अधिकारी तसेच सृष्टीग्रोचे प्रधान सर तसेच रोहा येथील शास्त्रज्ञ जितेंद्र कदम व त्यांच्या सहकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभल्याने सुमारे ५० खंडी पांढऱ्या कांद्याचे उत्पादन यशस्वी झाले आहे.

### शेतकरी हतबल

बदलते हवामान, अवकाळी पाऊस यामुळे अलिबाग तालुक्यातील पांढऱ्या कांद्याचा उत्पादन घेणारा शेतकरी हतबल झाला आहे. तसेच शेतकरीवर्गाला दिलासा देण्यासाठी व त्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी सहानुभूतीपूर्वक विचार करणे गरजेचे आहे.

### पाच लाखांचा नफा अपेक्षित

पांढऱ्या कांद्याचे लागवड, बेणणी, काढणी, माळा बांधणे तसेच खते, औषधे, मजूरवर्ग, देखभाल व मार्केटिंग याकरिता सुमारे तीन एकर शेतजमिनीत पांढरा कांदा उत्पादन घेण्यासाठी सुमारे चार लाख रुपये खर्च आला आहे. तरीही चार ते पाच लाख रुपये निव्वळ नफा मिळणे अपेक्षित आहे.

### महिलांना रोजगार

पांढऱ्या कांद्याची लागवड नोव्हेंबर ते मार्चपर्यंत केली जाते. त्यामुळे अनेक महिला वर्गाला रोजगाराची संधी निर्माण झाली आहे. तसेच पांढऱ्या कांद्याची वाढती मागणी लक्षात घेता यावर्षी मुंबई, नवी मुंबई, रायगड जिल्हा, पुणे, कल्याण, डोंबिवली आदी परिसरात पांढऱ्या कांद्याला जोरदार मागणी असून, मालाचा पुरवठा केला जात आहे.

म ह त्वा चे



## डॉ. गोसावी यांना पुरस्कार

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

गोखले एज्युकेशन सोसायटीचे विद्यमान सचिव तथा महासंचालक डॉ. एम. एस. गोसावी यांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील अतुलनीय व अद्वितीय योगदानाबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे. ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगशे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यता आले. वयाच्या ८७ व्या वर्षी देखील दिवसाचे १४ तास काम करुन व्रतस्थ भावनेने तपश्चर्या करणारे डॉ.गोसावी यांना आतापर्यंत विविध प्रतिष्ठित संस्थांचे एकूण ८० पुरस्कार मिळाले आहेत. जीवनगौरव पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान झाल्याची भावना त्यांच्या प्रियजनांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबीर

। रसायनी । वार्ताहर ।

शिवप्रेमी क्रिकेट संघ व ग्रामस्थ मंडळ खाने आंबिवली, यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त एक सामाजिक उपक्रम म्हणून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन १९ फेब्रुवारी एचओसीमधील शिवस्मारक याठिकाणी सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करावे, असे आवाहन केदार शिंदे, विनायक खाने व ग्रामस्थ मंडळ खाने आंबिवलीच्यावतीने करण्यात आले आहे.

### प्रेमरंगात रंगले प्रेमवीर

# अलिबागमध्ये व्हॅलेंटाईन विकची धूम

। अलिबाग । शहर वार्ताहर ।

**''प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं...'' प्रेमकवी मंगेश पाडगावकर यांच्या या प्रेमकाव्याचा परिचय नसलेली एकही व्यक्ती सहजासहजी सापडणार नाही. विविध भावभावनांपैकी प्रेम ही अत्यंत उदात्त अशी भावना. आणि या भावनांचे प्रकटीकरण करण्याचा, ती उत्कटपणे जगण्यासाठी पाश्चिमात्य संस्कृतीने जगाला दिलेली देणगी म्हणजे व्हॅलेंटाईन विक. अलिबागमध्ये यानिमित्त तरुणाईचा जल्लोष पाहायला मिळत आहे.**

याशिवाय बाजारात फुले, सॉफ्ट टॉय, विविध भेटवस्तू, स्पेशल ज्वेलरी, स्वीट्स अशा विविध वस्तू बाजारात दाखल झाल्या असून, शाळकरी ते कामगार पिढीपर्यंत त्यांची मागणी असल्याचे समजत आहे.

७ फेब्रुवारी रोजी रोझ डे पासून या व्हॅलेंटाईन विकला सुरुवात झाली. या दिवशी अलिबागमध्ये गुलाबांची मोठ्या प्रमाणात विक्री झाल्याची माहिती विविध फुलविक्रेत्यांकडून मिळाली असून, प्रेमवीरांनी मिळेल त्या पण नेहमीपेक्षा अधिक किमतीत गुलाबांची खरेदी केली आहे.


याशिवाय नाविन्य म्हणून चॉकलेटस्चे गुलाब आणि बुके यांचे क्रेझ आढळले. तसेच यानंतर विविध भेटवस्तूंची त्या-त्या दिवसानिमित्त खरेदी करण्यात आली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेल्या टाळेबंदीचा काळ सरल्यानंतर,



**आत्ताची पिढी फार अ‍ॅडव्हास आणि हुशार आहे. त्यामुळे खर्च करताना जपून पावले टाकते. कदाचित यामुळे लव्ह विक सुरु झाला असला तरी अजूनतरी फारसा प्रतिसाद दिसत नाही. यामुळे आम्हीपण १२ ते १४ यादरम्यान चॉकलेट्सवर १० टक्केची सुट देत असल्याची माहिती अंकुर ड्रायफुटचे कांतीलाल किराण यांनी दिली आहे.**

व्हॅलेंटाईन विकमध्ये ग्राहक उपलब्ध झाल्याने बाजारात आनंदाचे वातावरण आहे.

तर शैक्षणिक संकुलामध्ये कोणत्याही प्रकारची गैरकृत्य घडू नये, यादृष्टीने काळजी घेण्यात आली आहे. यामुळे शिक्षणावस्थेतील प्रेमवीरांची



समुद्रकिनारे, उद्याने अशा सार्वत्रिक ठिकाणी पण शक्यतो एकांत मिळेल तसेच परिचयाचे कुणी मिळणार नाही, अशा जागांकडे ओढा असल्याचे चित्र आहे.

प्रत्येक पिढीतील प्रेमवीर आपापल्यापरीने या व्हॅलेंटाईन विक किंवा डे साजरा करण्याचा प्रयत्न करीत असून, युवा वर्ग याबाबत सकारात्मक आणि नकारात्मक अशा विविध भूमिका घेताना आढळत आहे. तर प्रेमविवाह करणारी जोडपी जरी वृद्धापकाळाकडे झुकत असली तरीही, यानिमित्त आपल्या नेहमीच्या व्यापातून थोडा वेळ आपल्या प्रेमासाठी काढून, आठवणींना उजाळा देत साजरा करत आहेत.

> लव्ह डेस् वगैरे फॅड साजरे करण्यासाठी वारेमाप पैसा उधळला जातो. पण तो बाप कमाईपेक्षा आप कमाईचा असावा.
>
> – सागर पाटील, हाशिवरे, अलिबाग.

> प्रत्येक पिढीच्या अभिव्यक्तीची पद्धत वेगळी असते. म्हणून प्रेमाचे स्वरुप बदलते असे नाही. लव्ह असो वा अ‍ॅरेंज, आम्ही प्रत्येक दिवशी तितक्याच तजेल्याने जगतो.
>
> – प्रा.जयेश म्हात्रे, अलिबाग.

> प्रेम साजरे करण्यासाठी किंवा सादरीकरणासाठी कोणत्याही विशिष्ट दिवसांची गरज नाही. ती तर जगण्याची गोष्ट आहे. याबाबत ज्याचा–त्याचा दृष्टिकोन वेगळा असेल, हे निर्विवाद. तरीही काही विशिष्ट दिवस भरभरून जगावेत, आपल्या हृदयासाठी!
>
> – यज्ञेश पाटील, युवा सामाजिक कार्यकर्ते

# इस्त्राईलचे शिष्टमंडळ 'जेएसएम'मध्ये

। अलिबाग । शहर वार्ताहर ।



इस्त्राईलच्या मराठी सांस्कृतिक मंडळाचे सदस्य असलेल्या यार्देना सानकर, शालोम सानकर व अवनेर चोरडेकर यांच्या शिष्टमंडळाने नुकतीच अलिबाग येथील जे.एस.एम. महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली.

या शिष्टमंडळासोबत मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील व मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक कार्यक्रम समन्वयक श्री. निलेश सावे, मुंबई विद्यापीठाच्या आविष्कार संशोधन प्रकल्प स्पर्धेच्या समिती सदस्य डॉ.मीनाक्षी गुरव यांनी देखील महाविद्यालयास भेट दिली.

याप्रसंगी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. गौतम पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.अनिल पाटील यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व महाविद्यालयाच्या प्रगतीचा अहवाल सादर केला.

महाविद्यालयाने गेल्या काही वर्षात शैक्षणिक क्षेत्रात व एन.एस.एस., एन.सी.सी., क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम, मराठी भाषा व वाङ्मय अभ्यास मंडळ अशा अभ्यासपूरक उपक्रमांमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल या शिष्टमंडळाने समाधान व्यक्त केले व महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी रायगड दक्षिण विभागाचे सांस्कृतिक कार्यक्रम समन्वयक प्रा. जयेश म्हात्रे यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या युवा महोत्सवाचा आढावा घेत महाविद्यालयाने केलेल्या कामगिरीचा अहवाल सादर केला.

## महामार्गावर अपघात

। महाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील दासगाव गावाच्या हद्दीत चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने अपघात घडला आहे. या अपघातात ९ प्रवासी जखमी झाले असून, त्यांच्यावर महाड ग्रामीण रुग्णालयांत उपचार करण्यात येत आहेत. यामध्ये वैभव वसंत कदम, धीरज वसंत कदम, कविता धीरज कदम, विमल वसंत कदम, सुनील भागवत कदम, योगिनी सुनील कदम, विराज बाबु कदम, ध्रुवी धीरज कदम, आणि अन्वी सुनील कदम यांचा समावेश आहे. अपघाताची नोंद महाड शहर पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आली असून, अधिक तपास करण्यात येत आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. ललित गोविंद चौधरी, रा. अंबरनाथ, कानसई, ता. अंबरनाथ, जि. ठाणे यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत विद्यमान मालकांकडून विकत घेणे करीता ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :- मौजे- गणेगाव चिंचवली, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील शेत जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. | आकार पै. |
|---|---|---|---|---|---|
| प्रदीप सज्जन | ५४ | ४ | ०-६४-० | ० | ५४ |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात खाली सही करणार वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास,वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दि. १३-२-२०२२

**मनोज किसन क्षीरसागर**
(अ‍ॅडव्होकेट)
मु. सम्राट नगर, पो.नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड,पिन कोड ४१०१०१

# पर्यायी व्यवस्थेने प्रवासी बस सेवा सुरु करा

## मुरुड शहर संघर्ष समितीची मागणी



। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ कर्मचाऱ्यांकडून विविध मागण्यांसाठी करण्यात आलेल्या संपामुळे सर्व ठिकाणी प्रवासी वाहतूक बंद झाली आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थी यांचे सर्वाधिक हाल होत असून, आगार व्यवस्थापकांनी विभागीय कार्यालयाकडून पर्यायी चालक - वाहकांची मागणी करून प्रवाशी सेवा पूर्ववत त्वरीत सुरु करण्याची मागणी निवेदनामार्फत मुरुड शहर संघर्ष समितीतर्फे मुरुड आगार व्यवस्थापक सनील वाघचौरे यांचेकडे केली आहे.

या निवेदनात रायगड जिल्ह्यातील बहुतेक सर्व आगारांमधील एस.टी. वाहतूक सेवा सुरळीत चालू असताना फक्त आपल्या आगारातील सेवा बंद आहे. तरी आपले एस.टी. कामगार कामावर हजर होत नसतील तर त्यांच्या ऐवजी विभागीय अधिकारी, पेण-रायगड यांच्याकडून पर्यायी व्यवस्था करुन इतर ठिकाणाहून वाहक, चालकांची व्यवस्था करून वाहतूक व्यवस्था त्वरीत चालू करावी, अशी विनंती करण्यात आली आहे.

## म्हसळ्यामध्ये विद्यार्थ्यांचा गुणगौरव

। म्हसळा । वार्ताहर ।

युवा परिवर्तन म्हसळा या संस्थेमार्फत संस्थेमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या बेसिक कम्प्युटर, टॅली, इंग्लिश व मराठी टायपिंग, केक मेकर, नर्सिंग, डी.टी.पी. इत्यादी कोर्सचे प्रशिक्षण घेऊन यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

म्हसळा पंचायत समितीच्या सभापती छाया म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात व्हिजन एज्युकेशन फंडचे मुबश्शीर जमादार, अब्दुल शकूर घन्सार, वनरक्षक अधिकारी भीमराव सूर्यतळ, तहसील कर्मचारी चव्हाण तसेच युवा परिवर्तन म्हसळाचे मुख्याधिकारी मोहन जाधव, आकाश साळवे, युवा परिवर्तन मित्र मीनाक्षी जैन, रोहन तांबे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन युवा मित्र मीनाक्षी जैन हिने केले.

# शुभ्रा प्रकल्पाकडून शैक्षणिक साहित्याचे वितरण

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि कर्णबधिर यांच्या माध्यमातून सेंद्रिय खतांची निर्मिती करणाऱ्या शुभ्रा प्रकल्पाकडून स्थलांतरित मुलांच्या वीतभट्टीवरील शाळेला मदत करण्यात आली. या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थलांतरित विट कामगारांच्या मुलांना दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील दामत येथे भाविका भगवान जामघरे या कॉलेजमध्ये शिकत असलेल्या तरूणीने सामाजिक बांधिलकी जपत विटभट्टीवर काम करणाऱ्या विट कामगारांच्या मुलांसाठी शाळा सुरू केली आहे. या प्रकल्पाची माहिती भाग्यश्री वर्तक आणि सेंद्रिय शेतीचा ध्यास घेणारे हेमंत कोंडीलकर यांनी आपल्या शुभ्रा प्रकल्पाला दिली.

या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थलांतरित विट कामगारांच्या मुलांना खेळणी, दैनंदिन गरजेच्या वस्तु, साबण, कोलगेट, ब्रश, बिस्कीट वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रकल्पाच्या संस्थापिका भाग्यश्री वर्तक, भाविका जामघरे, भगवान जामघरे, हेमंत कोंडीलकर यांच्यासह रायगड भुषण सामाजिक कार्यकर्ते किशोर गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते दत्ता मसणे, अशोक गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

### ग्रुप ग्रामपंचायत होडगाव
**ता.माणगांव जि.रायगड**
**जाहीर निविदा** नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि.१४/०२/२०२२

ग्रुप ग्रामपंचायत होडगाव ता.माणगाव जि.रायगड यांजकडून खालील कामाकरीता जास्त नोंदणीकृत इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पध्दतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच सदरचे निविदा व दरपत्रक दि.२२/०२/२०२२ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय होडगाव येथे दुपारी १२:०० वाजेपर्यंत सादर करावे.

| अ. क्र. | कामाचे नाव/ साहित्याचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | कोरे निविदा फार्म फी | १% इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खर्डी खु.हनुमान मंदिर शौचालय व मुतारी बांधणे व पाणी सुविधा करणे. | १५वा वित्त आयोग | ९०००० | ३ महिने | २०० | ९०० |
| २ | ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाड्या व शौचालय दुरूस्ती करणे (होडगाव आदिवासी वाडी) | १५वा वित्त आयोग | ७२५३७ | ३ महिने | २०० | ७२५ |
| ३ | होडगाव आदिवासी वाडी स्मशान चौथरा बांधणे | १५वा वित्त आयोग | ८०००० | ३ महिने | २०० | ८०० |
| ४ | हातकेली बौध्दवाडी समाजमंदिर दुरूस्ती करणे | १५वा वित्त आयोग | ५०००० | ३ महिने | २०० | ५०० |
| ५ | विंचवली स्मशान भूमी निवारा शेड | १५वा वित्त आयोग | २००००० | ३ महिने | २०० | २००० |
| ६ | खर्डी खु.स्मशान भूमी निवारा शेड | १५वा वित्त आयोग | १७८२८१ | ३ महिने | २०० | १७८२ |
| ७ | हातकेली स्मशान शेड बांधणे | १५वा वित्त आयोग | १००००० | ३ महिने | २०० | १००० |
| ८ | शाळांकरीता आवश्यक साहित्य खरेदी करणे | १५वा वित्त आयोग | ४४५४८ | ३ महिने | २०० | ४४५ |
| ९ | अंगणवाडी करीता खेळणी व शैक्षणिक साहित्य | १५वा वित्त आयोग | ११४८१९ | ३ महिने | २०० | ११४८ |
| १० | हातकेली शाळा शौचालय दुरूस्ती व पाणी सुविधा | १५वा वित्त आयोग | १००००० | ३ महिने | २०० | १००० |
| ११ | मेडीक्लोर कार्बोलिक व टी सी.एल खरेदी करणे | १५वा वित्त आयोग | ५०००० | - | - | - |
| १२ | ग्रामपंचायत कार्यालय शौचालय बांधणे व पाणी सुविधा करणे. | १५ वा वित्त आयोग | १५५८१७ | ३महिने | २०० | १५५८ |

**अटी व शर्ती**

१ प्राप्त निविदा दि.२२/०२/२०२२ रोजी दु.१२.०० वाजता ग्रा.प.होडगाव येथे उपस्थितांच्या समक्ष मा.सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येतील.
२.निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती /चलन जोडलेली असावी.
३ कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४.कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील.
५ निविदा मंजूरी अंती ठेकेदार/पुरवठादार यांस रितसर करारनामा करून घावा लागेल.
६ कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहीत केलेल्या मुदतीचे काम पुर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व ज्ञाप्ती लागू करण्यात येईल.
७ साहित्य व वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली आहे.
८ निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
९ नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल.
१० ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयीकृत बँकेत असावे व प्रणालीशी संलग्न असावे.
११ कायद्याचा देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत होडगांव**
**ता.माणगांव जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत होडगांव**
**ता.माणगांव जि.रायगड**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक १. श्री. उमेश मनोहर भंगाळे, रा. समता नगर रोड, सुरेश नगर, जळगाव, २. श्री. मनोहर रघुनाथ काळोखे, रा. टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे टाकवे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| ३२ | ४ | ०-३३-९०<br>पो.ख. ०-०४-५० | २=८७ |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. १४-०२-२०२२

**अ‍ॅड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस.,एलएल.बी.
प्रभात अपार्टमेंट रुम नं. ४, दुसरा मजला,
सुनिल चिक्कीजवळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४, ९०२८५०८४९६

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


- मुख्य संपादक

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदिनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल






आजचे अन्नदाते



स्व. श्रीमती कलावती भवानजी देढीया स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग



प्रिषा चेतन दळवी, वाढदिवसानिमित्त अलिबाग



स्व. श्री. तेजराज हिम्मतमलजी जैन, स्मरणार्थ अलिबाग



श्री.अवधुत अजित नाईक, वाढदीवसानिमित, साई गुलाब एंटरप्राइजेस थल पालथी

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन



१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## म ह त्त्वा चे



### मॅन बॅटर लायम ठरला महागडा फॉरेनर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

इंग्लंड बॅटर लायम लिविंगस्टोनसाठी पंजाब किंग्जनं मोठी रक्कम मोजली. सनरायझर्स हैदराबाद आणि पंजाब यांच्यात इंग्लिशमॅनला आपल्या ताफ्यात घेण्यासाठी चांगलीच चुरस पाहायला मिळाली. सरतेशेवटी पंजाबने ११.५० कोटीचा डाव लावून खेळ जिंकला. मेगा लिलावाआधी पर्समध्ये मोठी शिल्लक राखून ठेवलेल्या पंजाबने दुसऱ्या दिवशीसाठीही इतर फ्रँचायझीच्या तुलनेत मोठी शिल्लक ठेवली. याचा फायदा त्यांना दुसऱ्या दिवशीच्या खरेदीवेळी होताना दिसतोय.

२ कोटींच्या घरातील लायम लिविंगस्टोन यापूर्वी सनरायझर्स हैदराबादकडून खेळताना दिसला आहे. आता तो पंजाबकडून खेळेल. आतापर्यंतच्या लिलावातील तो सर्वात महागडा परदेशी खेळाडू आहे. त्याच्यापाठोपाठ निकोलस पूरन आणि श्रीलंकेच्या हसरंगाचा नंबर लागतो. पूरनसाठी हैदराबाद संघाने तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने हसरंगासाठी १० कोटी ७५ लाख मोजले आहेत.

# आयपीएलच्या महालिलावात भारतीयांचा बोलबाला

**अनेक अनकॅप्ड खेळाडू 'करोडपती'**

**किशनवर सर्वाधिक बोली, चहर दुसऱ्या, तर श्रेयस तिसऱ्या क्रमांकावर**

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

पहिला दिवस जोरदार होता आणि सर्व १० फ्रँचायझींनी अनेक भारतीय आणि परदेशी खेळाडूंवर भरपूर पैसे खर्च केले. इशान किशन १५.२५ कोटींसह सर्वात महागडा खेळाडू ठरला. इतर संघांनी दीपक चाहर, श्रेयस अय्यर आणि आवेश खान या युवा भारतीय खेळाडूंमध्येही रस दाखवला. अवेश खान १० कोटींच्या बोलीसह सर्वात महागडा अनकॅप्ड खेळाडू ठरला.

आयपीएलच्या महालिलावात शनिवारी २० कोटी रुपयांच्या महाबोलीची अपेक्षा फोल ठरली. परंतु झारखंडचा यष्टीरक्षक-फलंदाज इशान किशन हा लिलावातील सर्वाधिक महागडा क्रिकेटपटू ठरला. १५ कोटी, २५ लाख रुपये रकमेला मुंबई इंडियन्स संघात त्याला स्थान दिले. अष्टपैलू दीपक चहर (१४ कोटी) आणि धडाकेबाज फलंदाज श्रेयस अय्यर (१२.२५ कोटी) यांनी महागड्या खेळाडूंच्या यादीत दुसरे आणि तिसरे स्थान मिळवले. अनुक्रमे चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाइट रायडर्सने त्यांना संघात घेतले. सकाळच्या पहिल्या सत्रावर श्रेयसने लक्ष वेधले. मात्र लिलावाच्या दुसऱ्या सत्रात इशानला संघात कायम राखण्यासाठी मुंबईने सनरायजर्स हैदराबादशी कडवी लढत देत आकडा १५ कोटींपार उंचावला.




आकड्यात चौथ्या क्रमांकावर चार खेळाडूंवर १० कोटी, ७५ लाख रुपयांची बोली लागली.

'राजस्थान रॉयल्सने अनुभवी फिरकीगोलंदाजरविचंद्रनअश्विनसाठी ५ कोटी रुपये मोजले, तर डावखुऱ्या देवदत्त पडिक्कलला ७ कोटी, ७५ लाख रुपये बोलीसह प्राप्त केले. भारताच्या अनुभवी खेळाडूंपैकी सलामीवीर शिखर धवनसाठी पंजाब किंग्जने ८.२५ कोटी, तर वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीसाठी गुजरात टायटन्सने ६.२५ कोटी रुपये मोजले. चेन्नई सुपर किंग्जने ड्वेन ब्राव्हो (४.४० कोटी), अंबाती रायुडू (६.७५ कोटी) आणि रॉबिन उथप्पा (२ कोटी) या खेळाडूंना कायम राखले.

परदेशी खेळाडूंपैकी वेस्ट इंडिजचा अष्टपैलू जेसन होल्डरला लखनऊ सुपरजायंट्सने ८.७५ कोटी, दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कॅगिसो रबाडाला पंजाब किंग्जने ९.२५ कोटी, तर स्फोटक फलंदाज शिमरॉन हेटमायरला राजस्थान रॉयल्सने ८.५ कोटींपर्यंत बोली उंचावली. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने सलामीवीर आणि कर्णधारपद हे दोन्ही प्रश्न सोडवण्याच्या इराद्याने फॅफ ड्युप्लेसिसला ७ कोटी रुपयांना संघात स्थान दिले, तर क्विंटन डीकॉकला (६.७५ कोटी) लखनऊने स्थान दिले.

## सुभाष पुजारी यांना 'मास्टर महाराष्ट्र श्री' बहुमान

। पनवेल । वार्ताहर ।

महामार्ग पोलीस केंद्र, पळस्पेचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी यापूर्वी देखील आंतरराष्ट्रीय पातळीवर शरीरसौष्ठव या प्रकारामध्ये चमकदार कामगिरी व घवघवीत यश संपादन करून परकीय भूमीवर भारताचा झेंडा फडकावला आहे.

नुकत्याच झालेल्या शरीरसौष्ठव स्पर्धेत देखील सुभाष पुजारी यांनी 'मास्टर महाराष्ट्र श्री' हा बहुमान दुसऱ्यांदा पटकावून या प्रकारात आपला दबदबा किती आहे हे दाखवून दिलेले आहे. तसेच त्यांची पाँडिचेरी येथे देश



पातळीवरील होणाऱ्या 'मास्टर भारत श्री' स्पर्धेकरिता निवड झालेली आहे. पाँडिचेरी येथे होणाऱ्या शरीरसौष्ठव स्पर्धेकरिता महाराष्ट्र राज्यातर्फे सुभाष पुजारी हे सहभागी होणार आहेत व त्या स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. सदर बाब ही खरोखरच महाराष्ट्रासाठी व महाराष्ट्र पोलीस दलासाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. त्यामुळे साहजिकच महाराष्ट्र पोलीस दलाची प्रतिमा देखील अधिक उंचावली गेली आहे. सुभाष पुजारी यांना महाराष्ट्र पोलीस दलातून पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा मिळाल्याच आहेतच.

जिद्द, चिकाटी व परिश्रम याचे उत्तम व आदर्श उदाहरण म्हणजे सुभाष पुजारी. पाँडिचेरी येथे होणाऱ्या स्पर्धे करिता शुभेच्छा व जागतिक पातळीवर अव्वल येण्याचे त्यांचे जे ध्येय आहे त्या ध्येयाला गवसणी घालण्याकरिता त्यांना सर्वांकडून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## पनवेलमध्ये रंगणार रंगछटा २०२२

। पनवेल । वार्ताहर ।

प्रीतम म्हात्रे यांच्या जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून पनवेल मधीलच तरुण युवक कलाप्रेमींच्या रिफ्लेक्शन थियेटरच्या नियोजनाखाली एकपात्री आणि द्विपात्री नाटक स्पर्धेचे आयोजन १६ फेब्रुवारी २०२२ रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे सकाळी १०.०० वाजता रंगछटा २०२२ या नाट्य स्पर्धेचे आयोजन येथे केले आहे. अधिक माहितीसाठी ९५२७०९९७८४ / ७०२१४६९५६७ या क्रमांकावर संपर्क साधावा अशी माहिती आयोजकांकडून सांगण्यात आली.



**अलिबाग:** शहरातील सर्व रस्त्यांची दुरुस्ती तसेच डांबरीकरणाचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. महावीर चौक ते बालाजी नाका येथील रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाल्यानंतर आता समुद्र किनारा ते पोस्ट ऑफिस अलिबागपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येत आहे. या कामाची नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी पाहणी करीत काही सूचना केल्या. नगरपरिषदेच्या वतीने करण्यात येत असलेल्या विकास कामांबाबत नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## राज्यस्तरीय शुटिंग बॉल स्पर्धेचे उद्घाटन

। खारेपाट । वार्ताहर ।

विद्युत क्रीडा मंडळ मांडवखार आयोजित स्व.श्रीकांत मोकल यांच्या स्मरणार्थ ६२वी राज्यस्तरीय शुटिंग बॉल स्पर्धेचे उद्घाटन अमित नाईक यांच्या हस्ते झाले. यावेळी अमित नाईक यांनी सर्व खेळाडूंना व आयोजकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी चिंचवळी माजी सरपंच राजाराम गावंड, पांडुरंग म्हात्रे, मुंबई शुटिंग बॉल असोसिएशनचे अध्यक्ष दिपक सावंत, विद्युत क्रीडा मंडळ अध्यक्ष शंकर मोकल,ज्येष्ठ खेळाडू प्रल्हाद मोकल, सामाजिक कार्यकर्ते संतोष आबांडे, अनंत हरी पाटील, तसेच विद्युत क्रीडा मंडळाचे खेळाडू व पदाधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती. तसेच राष्ट्रीय खेळांडू रत्नेश मोकल व अन्य खेळाडूंचा सन्मान मान्यावरांच्या हस्ते करण्यात आला.

## अमित कदम, श्रेयश पाटील यांची राष्ट्रीय पंच म्हणून निवड

। अलिबाग । वार्ताहर ।

जागतिक बुध्दीबळ संघटना फिडे यांचे नॅशनल आर्बिटर तर भारतीय बुध्दीबळ महासंघातर्फे सीनियर नॅशनल आर्बिटर म्हणून अमित कदम व श्रेयश पाटील यांची निवड अखिल भारतीय बुध्दीबळ संघटनेने चेस फॉर एव्हरग्रीन या उपक्रमा अंतर्गत ३ ते ७ डिसेंबर रोजी पाच दिवसीय राष्ट्रीय पंच प्रशिक्षण शिबीराचे ऑनलाईन घेतले होते.



रायगड जिल्हा बुध्दीबळ संघटनेतर्फे या राष्ट्रीय पंच प्रशिक्षण शिबीरासाठी या राष्ट्रीय पंच प्रशिक्षण शिबीरासाठी राज्यस्तरीय पंच परीक्षेत ए ग्रेड मिळविलेले अमित कदम आणि श्रेयश पाटील यांची निवड करण्यात आली होती. लेखी परीक्षा यशस्वी पास होऊन त्याची सिनीयर नॅशनल राष्ट्रीय पंच म्हणून त्याची निवड करण्यात आली आहे.

## 'प्रियांका पंजाब नाल' सोशल मीडियावर ट्रेंड

**वर्षा मेहता**

। अलिबाग ।

पंजाबमधील कोटकपुरा येथे रविवारी नवी सोच नवा पंजाब निवडणूक रॅलीत काँग्रेस



नेत्या प्रियंका गांधी वाड्रा यांनी दावा केला की आम आदमी पक्ष हा उजव्या विचारसरणीच्या हिंदू संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) मधून उदयास आला आहे. रॅलीत प्रियांका गांधी वढेरा म्हणाल्या, आम आदमी पार्टी आरएसएसमधून उदयास आली आहे. दिल्लीत शैक्षणिक आणि आरोग्यसेवा संस्थांच्या नावावर काहीही नाही. राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांबद्दल सत्य जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

कोटकपुरा येथील काँग्रेसचे उमेदवार अजयपाल सिंग संधू यांच्यासाठी प्रचार करताना त्या म्हणाल्या, पंजाबचे सरकार पंजाबमधून

**काँग्रेसचा पंजाबमध्ये प्रचार**

चालवले जावे, दिल्लीतून नव्हे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावरुन भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर हल्लाबोल करताना त्या म्हणाल्या, शेतकऱ्यांच्या आंदोलनात अनेकांना आपले प्राण गमवावे लागले, पण तुम्ही सगळे झुकले नाहीत. ती म्हणजे पंजाबियत.

SOCIAL MEDIA पडसाद

मला पंजाबियत समजते. तुम्हा सर्वांना माहित आहे की मी एका पंजाबी माणसाशी लग्न केले आहे. माझ्या मुलांमध्ये पंजाबी रक्त आहे. पंजाबी लोकांचे हृदय धाडसी आहे.

प्रियांका गांधींच्या या रॅलीचे फोटो आणि विडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्याचसोबत हॅशटॅग 'प्रियांका पंजाब नाल' सोशल मीडियावर ट्रेंड झाले.

## द्रोणागिरी किल्ल्यावर शिवजन्मोत्सवाचे आयोजन

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील ऐतिहासिक द्रोणागिरी किल्ल्यावर शिवजयंती निमित्त शिवजन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १८, १९ फेब्रुवारी असे दोन दिवस शिवजन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

आगरी कोळी- कराडी संघर्ष सामाजिक संस्था, सह्याद्री प्रतिष्ठान उरण विभाग, शिवभक्त प्रतिष्ठान उरण विभाग, शिवशक्ती मित्र मंडळ उरण चारफाटा, योगा विथ पूनम ग्रुप, यान्सी ग्रुप ऑफ लिव्हीस टीम, युवा शिवशक्ती मित्र मंडळ डाऊरनगर, शिवछत्रपती मित्र मंडळ करंजा, अवनी सामाजिक संस्था उरण, डाऊर नगर ग्रामस्थ आणि मित्र परिवार आदी संस्था या शिवजनमोत्सवात सहभागी होणार आहेत.



शुक्रवार १८ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी २ वाजता द्रोणागिरी गडाची साफसफाई, गडावरील कुंडातील पाणी घेऊन खाली उतरणे, विमला तलाव उरण शहरात महाराजांच्या मूर्तीचे अभ्यंग स्नान, द्रोणागिरी गडाबद्दल माहिती आणि इतिहास वर्णन, मशाल फेरी आणि विमला तलाव येथे दीपोत्सव तसेच १९ फेब्रुवारी २०२२ रोजी बाळ शिवाजी राजांचा पाळणा हलविणे, शिवप्रतिमा पूजन, प्रतिमा मिरवणूक, शिव राज्याभिषेक, दुर्ग पूजन, पोवाडा, व्याख्यान, मान्यवरांचे स्वागत व शिवभोजन, गडावरून खाली उतरणे, निरोप समारंभ असे दोन दिवस विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिवजमोत्सवात सहभागी होण्यासाठी प्रकाश कवले ९९३०४७०९५५, सतीश जुनघरे ९६६४७३०५४६, प्रांजल पाटील ९६१९५००२२८, रविंद्र भोईर ९९६९३१४३९९, चेतन गावंड ९८१९७५९१०५ यांच्याशी संपर्क साधावे असे आवाहन दुर्ग मावळा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

## जंजिरा खुला केल्याने पर्यटकांची मांदियाळी

। मुरूड । वार्ताहर ।

गेल्या शुक्रवार पासून मुरूडचा प्रसिद्ध जंजिरा जलदुर्ग पर्यटकांना पाहण्यासाठी शासनाने खुला केल्याने मोठा अपेक्षित परिणाम दिसून आला असून, शनिवारी मोठ्या संख्येने मुरूड बीचवर पर्यटकांनी हजेरी लावल्याचे दिसून येत आहे. शनिवारी काशिद बीचवर पर्यटकांची फारशी वर्दळ नसल्याची माहिती काशिद येथील सूर्यकांत जंगम यांनी सायंकाळी दिली. त्या पार्श्वभूमीवर मुरूड बीचवर सायंकाळ पासून पर्यटकांची प्रचंड हजेरी दिसून आली. बनाना बोटिंग, आणि समुद्रातील विविध जलक्रीडांचा आनंद पर्यटक लुटताना दिसत होते. मुरूड बीचवरील वाळुवर मोफत पार्किंगची सुविधा असल्याने पर्यटक वाहने पार्क करून समुद्र किनाऱ्यावर मनसोक्त फिरण्याचा आनंद लुटताना दिसून आले. मुरूड बीचवर ४० पेक्षा अधिक स्टॉल्स असून बीचवर खुल्या वातावरणात बसण्याची सुविधा असल्याने पर्यटक सुखावले आहेत. आगामी काळात मुरूडचे पर्यटन अधिक वाढणार याची ही नांदी ठरणार अशा प्रतिक्रिया मुरूड बीचवर पुणे येथून आलेल्या पर्यटकांनी व्यक्त केल्या.

# सुधागडात शिवकालीन युद्ध कलेची जोपासना

**प्रात्यक्षिके दाखवितात प्रशिक्षण, विविध शस्त्रास्त्राची माहिती**

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

शिवरायांचे आठवावे रूप शिवरायांचा आठवावा प्रताप, शिवरायांचे दैदिप्यमान शौर्य साडेतीनशे वर्षांनंतरही जनतेच्या मनामनात स्फूर्ती आहे. शिवरायांच्या याच रोमहर्षक व थरारक शस्त्रास्त्र कलेची व युद्धकलेची माहिती सर्वसामान्यांना व प्रामुख्याने तरुण व लहानग्यांना मिळावी आणि त्यांना या कलेचे प्रशिक्षण मिळून स्वसंरक्षणाचे धडे मिळावेत. यासाठी रायगड जिल्ह्यात विविध संस्था व व्यक्ती शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध कलेची जोपासना करत आहेत. त्यासाठी प्रात्यक्षिके दाखवितात याबरोबरच प्रशिक्षण देखील देत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक तरुण व लहान मुले-मुली ही शस्त्रास्त्रे कला अंगीकारत आहेत.





छत्रपती शिवाजी महाराजांनी सोळाव्या वर्षी तोरणा किल्ला घेऊन मावळ्यांना शारीरिक व्यायामाचे व युद्धकलेचे महत्त्व पटवून दिले. सुधागड तालुक्यातील जय हनुमान आखाडा शिळोशी हे याच शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध कलेच्या माध्यमातून स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण शहर व गावखेड्यातील मुलांना देत आहेत. या मंडळाचे अध्यक्ष शरद गोळे हे शिवकालीन कलेचे संवर्धन व्हावे, सर्वसामान्यांना ती कळावी व या केलेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत असतात. मागील २० वर्षांपासून कै. भिकू दंत यांच्या प्रेरणेतून जय हनुमान आखाडा मंडळ व गावातील तरुण ही कला जोपासण्यासाठी प्रचंड मेहनत घेत आहेत. या आखाड्यात ४-५ वर्षांच्या मुलांपासून ते अगदी ४० ते ५० वयोगटातील नागरिक देखील आहेत. ही कला व खेळ सध्या दुर्मिळ झाले आहेत. मात्र या मंडळाने ही कला टिकविण्यासाठी अथक परिश्रम व मेहनत घेतली आहे.

तरुणांना व शाळकरी मुलांना निर्व्यसनी व निरोगी राहण्यासाठी व ऐतिहासिक वारसा जोपासण्यासाठी या कलेतून प्रोत्साहन दिले जात आहे. लाठी-काठी, तलवारबाजी, झोडकाठी, बिचवामारी, पेटत्या गाड्यातील कसरती तसेच मल्लखांबाचे प्रात्यक्षिक मैदानात दाखवले जाते. जय हनुमान आखाडा मंडळ या मैदानी कसरती वेगवेगळ्या उपक्रमातून सादर करतात. ही प्रात्यक्षिके पाहतांना प्रेक्षकांना शिवकालीन युद्धाचा थरार व ऐतिहासिक काळाची अनुभूती येते. या मंडळाने रायगड जिल्ह्यातील रोहा, कर्जत, खालापूर आदी विविध तालुक्यांमध्ये आपल्या कलेचे प्रदर्शन केले आहे.



श्रीवर्धन मधील शैलेश ठाकूर यांनी २००५ पासून अथक परिश्रम करून विविध शिवकालीन शस्त्र जमा केली आहेत. तलवार, भाला, दांडपट्टा, ढाल, विटा व बाण अशा शस्त्रांचा संग्रह त्यांनी केला आहे. शैलेंद्र ठाकूर सामाजिक कार्याबरोबरच कराटे, मल्लखांब व शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण देतात. शिवचरित्रावर असलेल्या प्रेमातून शिवकालीन शस्त्र जमा करण्याचा छंद ठाकूर यांना लागला आणि शस्त्र जमा करत असतांना ती कशी चालवावी या जिज्ञासेपोटी ठाकूर यांनी तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांद्वारे व इतर तज्ञांच्या माध्यमातून शिवकालीन युद्धकलेविषयी माहिती घेतली आणि या युद्धकलेचे ज्ञान आत्मसात केले.

मागील अनेक वर्षांपासून ते या युद्धकलेचे प्रशिक्षण तरुण व युवकांना देत आहेत. त्याचबरोबर विविध उपक्रमात शिवकालीन युद्ध कलेची प्रात्यक्षिके ठाकूर दाखवतात. अशाच प्रकारे जिल्ह्यात काही संस्था, व्यक्ती तसेच शाळांच्या माध्यमातून शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध कला अजूनही जोपासली जात आहे.

> शिवछत्रपती महाराजांवरील भक्ती व त्यांच्या श्रद्धेतून शिवकालीन युद्धकलेचा अभ्यास केला. तत्कालीन काळातील शस्त्र जमा केली. यासाठी बराच संघर्ष करावा लागला. मुलांसाठी शिवकालीन युद्धकलेचा आखाडा सुरू करणार आहे. स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्यात ही कला कायम टिकून राहिली पाहिजे यासाठी प्रयत्नशील आहे.
>
> - शैलेंद्र ठाकूर, शिवकालीन शस्त्रास्त्र व युद्धकला प्रशिक्षक

## रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचे उद्घाटन

। नेरळ । वार्ताहर ।

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समितीकडून गेली ४९ वर्षे महाराष्ट्रामध्ये गरीब, गरजूंसाठी, वनवासी वाड्यांवर, आपत्तीमध्ये अविरत सेवेचे कार्य करीत आहे. या समितीच्या वतीने नेरळ मध्ये नव्याने रुग्णोपयोगी साहित्य केंद्र सुरू करण्यात आले. केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. अश्विनी कर्वे यांनी हे केंद्र रूग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी आधार केंद्र बनेल असा विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी आनंद राऊळ, नितीन भावे, संतोष देशमुख नितीन भावे, डॉ. अशोक कर्वे, ओंकार जोशी, आनंद काळे, बंडू काळे, केतन शिंदे, प्रयुश पारेख, अक्षय जोशी तसेच नेरळ मधील नागरिक उपस्थित होते. प्रमोद भडसावळे, रमेश कुलकर्णी हे रुग्ण उपयोगी साहित्य केंद्रामध्ये सेवा देणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर शेवटी ओंकार भडसावळे यांनी आभार मानले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)